रशियाचा शेतकरी

विनायक महादेव भुस्कुटे.

किंमत चार आणे.

मुद्रक
शं. का. निगडे,
' व्यापारीमित्र छापखाना '
२८०, रविवार पेठ, पुणें २.

प्रकाशक
वि. म. भुस्कुटे,
पेंडसे चाळ, सदाशिव पेठ,
पुणें २.

नाम

रशियाचा शेतकरी

प्राचीन समाजसत्तात्मक सामुदायिक शेती

कौरवपांडवांच्या युद्धासारखीं युद्धें झालीं, देशांतील राज्य-सत्तांची उलथापालथ झाली. हूण आले, शक आले, शबरांनीं स्वाऱ्या केल्या. सेमिरामिस, शिकंदर, महंमद गिझनी वगैरेंनीं देशांत धुमाकुळ माजविला, शहरें लुटलीं व त्यांतील संपत्ति उंटावर लादून परदेशीं नेली, पण त्याचा परिणाम शेतकऱ्यांवर झाला नाहीं. या सर्व राजकीय स्वाऱ्यांचा व उलाढालींचा आपल्याशीं कांहीं संबंध नाहीं असाच तो समजत होता. नांगरणी, पेरणी, कोळपणी, लाणी हीं सर्व त्याचीं कामें अव्याहत चालू होतीं. एखादी मोठी वावटळ आली व आपल्या झोंपड्यांचीं छप्परें उडालीं किंवा एकाद्या नदीला अकस्मात महापूर आला व आपलीं घरेंदारें वाहून गेलीं म्हणजे तेवढ्यापुरती मनुष्य सारवा-सारव करतो. देवानें पाठविलेलें संकट म्हणून तो त्याला तेवढ्या-पुरतें कसें तरी तोंड देतो. वरील आपसांतील युद्धांच्या व पर-चक्रांच्या बाबतींत शेतकऱ्यांची हीच भावना होती. हा शेतकरी-वर्ग खेड्यापाड्यांतून एकजुटीनें राहत होता. त्यावेळच्या खेड्यां-तील ग्रामपंचायती म्हणजे शेतकऱ्यांचीं स्वतंत्र स्वराज्येंच होतीं. या पंचायती गांवचा सर्व कारभार करीत असत. राजसत्तेला करभार पोंचविला कीं गांवचें कर्तव्य संपलें. हा करभार उत्पन्ना-च्या किती प्रमाणांत पोंचवावयाचा याचा विचारसुद्धां गांवपंचायत करीत नसे. राजाला कर द्यावयाचा, गांवगाडा व्यवस्थितपणें

चालवावयाचा, गांवांतील सर्व तंटेबखेडे व इतर तक्रारी यांचा विचार करून निकाल द्यावयाचा हीं सर्व कामें या पंचायती करीत असत. गांवांतला माल व्यापाऱ्यांकडे सोपवावयाचा व गांवाला लागणारा माल त्यांच्याकडून घ्यावयाचा हीं कामें या पंचायतीमार्फतच होत असत. त्यामुळें देशांत कसल्याही उलथापालथी झाल्या तरी शेतकऱ्याला त्याची पर्वा नसे. मध्ययुगपूर्व कालीं आशियांतील व युरोपांतील बहुतेक सर्व देशांत हीच व्यवस्था होती. या सर्व देशांतले शेतकरी कमजास्त सुधारलेले असले तरी त्यांच्यांतील गांवगाड्याची पद्धति जवळजवळ एकसारखीच होती. रशियांतील शेतकरीही या सामान्य इतिहासक्रमाला अपवाद नव्हता.

रशियांतील ग्रामपंचायतींना "मीर" अशी संज्ञा होती. ही 'मीर' म्हणजे गांवांतली एक सर्वसत्ताधारी संस्थाच होती. 'मीर'ची परवानगी मिळाल्याशिवाय कोणाहि शेतकऱ्याला गांव सोडून जातां येत नसे. मीरचा पासपोर्ट न घेतां कोणी शेतकरी परगांवीं गेलेला आढळला कीं, त्याला दंड करण्यांत येत असे. मीरनें एकदां निकाल दिला कीं, त्यावर अपील नसे. ही मीर मोठ्या मुदतीच्या कैदेच्या शिक्षा देत असे व सैबेरियांत जन्मभर हद्दपारीची शिक्षाही ती देऊं शकत असे. गांवच्या सरहद्दींतील जमिनीपैकीं योग्य ते तुकडे गांवांतल्या कुटुंबांना वांटून द्यावे व त्याची लागवड होत आहे कीं नाहीं हें पहावें, हें या मीरचें मुख्य काम होतें. जेवढें कुटुंब मोठें, तेवढी जमीन जास्त मिळते हें पाहून आपलें कुटुंब मोठें आहे असें दाखविण्याची रशियांतील त्या वेळच्या शेतकऱ्याची प्रवृत्ति होती. म्हणून लग्न करावयाचें तें प्रेमाकरितां म्हणून कोणीच करीत नसे. आपल्या घरांतलें एक

काम करणारें मनुष्य वाढलें हें दाखविण्याकरितांच लग्नें करण्यांत येत. मुलें लहान असलीं तरी त्यांचीं लग्नें लावून देण्यांत येत. वरवधूंच्या वयाकडे कोणीं फारसें लक्ष देत नसे. ही प्रथा दिवसें-दिवस इतकी वाढत गेली कीं, रांगत्या मुलांचीं मोठ्या तरुण मुलींशीं लग्नें लावून देण्यांत येत व तरुण स्त्रिया आपल्या या चिमुकल्या पतिराजांना कडेवर घेऊन शेतावर कामाला जात असत. प्रत्येक कुटुंबांतील वडील मनुष्य मीरमध्यें प्रतिनिधी म्हणून भाग घेत असे. सर्व निर्णय अर्थात् हात वर करून बहु-मतानें करण्यांत येत. जमिनींची वांटणी करतांना मात्र बहु-मताचा उपयोग करण्यांत येत नसे. या बाबतींत चिठ्ठया टाकून निर्णय घेण्यांत येत असे. मीरमध्यें स्त्रियांनाहि घेण्यांत येत असे. एकाद्या कुटुंबांत वडीलधारें माणूस स्त्री असेल तर तिला मीरमध्यें काम करण्याचा हक्क मिळत असे. मीरमध्यें स्त्रियांना बसण्याचा हक्क होता एवढ्यावरून स्त्रीसंबंधानें पुरुष मंडळींना मोठासा आदर वाटत होता अशांतला भाग नव्हता. एकाद्या प्रश्नावर स्त्रीसभासद बोलूं लागली तर पुरुष त्याकडे विशेष लक्ष देत नसत आणि स्त्रियांचें नेहमींचें अस्त्र म्हणजे रोदन ! हें रोदन सुरूं झालें, स्त्रिया हुंदके देऊं लागल्या व त्यांच्या नेत्रांतून गंगायमुना वाहूं लागल्या कीं, त्यांकडे मुळींच लक्ष देण्यांत येत नसे. स्त्रियांनीं एखाद्या पक्षाचा कड घेतला कीं, त्यांच्या बोलण्याचा शेवट गंगायमुनांत व्हावयाचा असें नेहमींचेंच जणूं काय ठरून गेलें होतें. " स्त्रियांना आत्मा नसतो, स्त्रियांचा प्राण म्हणजे केवळ वाफेचा भपकारा होय. सात स्त्रियांचे प्राण एकत्र केले तर ते एका पुरुषाच्या आत्म्याशीं बरोबरी करतील. " अशा अर्थाच्या म्हणी रशियांतील शेतकऱ्यांत रूढ होत्या. " लांब सडक केस व

कोतें व सडकें मन" ही स्त्रियांसंबंधाची सामान्य अनादराची भावना तर रशियांतील ग्रामिकांत रूढच होती. स्त्रीवर्गासंबंधानें अशी अनादराची व हीनपणाची भावना असली तरी मीरमध्यें काम करण्याच्या व मत देण्याच्या हक्काच्या आड ही भावना येऊं शकत नसे.

गांवांतील कुटुंबांना त्यांच्या आवश्यकतेनुसार व सामर्थ्यानुसार जमिनी देण्यांत येत पण एवढ्यानेंच मीरवरची जबाबदारी संपत नसे. हीं वांटून दिलेलीं शेतें योग्य प्रकारें लागवडीस आणलीं जातात कीं नाहीं हें मीरला पहावें लागे. इतकेंच नव्हे तर एकाद्या कुटुंबांतील तरुणाजवळ घोडा नसला तर तो पाहून देण्याचें कामही मीरमधील मुख्य पाटलाला करावें लागे. यामुळें पाटलानें तरुण शेतकऱ्याला घोडा पाहून द्यावा व गांवांतल्या वृद्ध स्त्रियांनीं त्याच्याकरितां सोबतीण निवडून द्यावी अशी प्रथाच पडली होती. या मध्यस्थ स्त्रियांना 'स्वाखी' म्हणत. या स्वाखींनीं मनांत आणल्यावर कोणाचेंही लग्न होणें फारसें अडचणीचें पडत नसे. गांवांखालची जमीन वांटून देण्यांत आली असली तरी या जमिनीवरील सर्व प्रकारची मेहनत मशागत एकेकटें कुटुंब एकाकीपणानें कधींच करूं शकत नसे. ती सामुदायिक रीतीनेंच करावी लागे. आणि अशा रीतीनें पिकविलेल्या शेतांचें उत्पन्न ज्याच्या त्याच्या गरजेप्रमाणें वांटून देण्यांत येई. पेरणी, भांगलणी, कापणी वगैरेंच्या वेळा ठरविणें हीं कामें मीर करीत असे व तिच्या आज्ञेनुसार हीं सर्व कामें चालत. मीरमध्यें कोणाला घ्यावें न घ्यावें हें ठरविणें, मीरच्या अध्यक्षाची निवडणूक करणें, सामुदायिक कर वसूल करणाऱ्या इसमाची निवड करणें, शेतांवर देखरेख करणाऱ्या पहारेकऱ्यांची निवड करणें वगैरे सर्व कामें

मीरला करावी लागत. नवीं घरें कोणीं कोठें बांधावीं याबद्दलही मीरचा निर्णय घेण्यांत येई व कधीं कधीं अगदीं घरगुती कारभाराच्या बाबतींतही मीरला ढवळाढवळ करणें भाग पडे. या सर्व गोष्टींचा विचार करतांना मीरचे सभासद अगदीं सचोटानें वागत असें मात्र नाहीं. विशेषतः दारूचा गुत्ता गांवांत उघडावा कीं कीं नाहीं ? उघडला तर तो कोठे उघडावा ? याबद्दल चर्चा सुरूं झाली व त्या बाबतींत निर्णय देण्याची पाळी आली कीं पैशाची थैली मोकळी सोडणारा धाडसी व्यापारी या गोष्टीचा निर्णय आपल्यासारखा करून घेई. शेतकरी कुटुंबांना वांटून दिलेल्या जमिनीवरील कराचें प्रमाण अत्यंत माफक असे.

जमिनीच्या मगदुराच्या दृष्टीनें रशियाचे उत्तररशिया व दक्षिणरशिया असे दोन भाग पाडावे लागतात उत्तररशियांतील पुष्कळसा भाग दाट जंगलांनीं व्याप्त असून त्यांत दलदलीचीं मैदानेंही पुष्कळ. निरनिराळ्या नद्यांचे फांटे या भागांतून गेले असल्यामुळें पाणी मुबलक पण जमीनच मुरकट व खडकाळ. दक्षिणरशियांतील जमीन काळीभोर, पिकाला उत्तम, पाणी मुबलक, जमीन लागवडीला आणावयाची म्हटलें तर फारसे श्रम न पडतां लागवडीला योग्य करता येण्याजोगी हवी तेवढी जमीन. ही सर्व परिस्थिति पाहून प्राचीन काळच्या त्या 'मीर' संस्थांनीही दक्षिणरशियांतील कराचें प्रमाण उत्तररशियांतील कराच्या प्रमाणपेक्षां जास्त ठरविलें होतें. सामुदायिक जमिनींत सामान्यतः तीन भाग पाडण्यांत येत. खेडुतांना राहण्याकरितां घरें बांधण्याला योग्य जमीन, लागवडीची जमीन व गुरेंचराईची जमीन. अशा रीतीनें ग्रामिकांच्या सर्व सुखसोयी पहाणारी 'मीर' आदराला पात्र झाली होती व

त्याबरोबरच तिच्या हातीं असलेल्या अनियंत्रित अधिकारामुळें ग्रामवासीयावर तिचा दराराही होता.

रशियांतील त्या वेळचा शेतकरी फारच देवभोळा होता. सगळेच शेतकरी देवभोळे असतात. दर आठवड्यास चर्चला गेलें पाहिजे व तें सुद्धां स्नान करून व स्वच्छ कपडे घालून गेलें पाहिजे, असें केलें नाहीं तर चर्चचें वातावरण दूषित व पापमय होईल अशी त्याची समजूत होती. साप्ताहिक स्नान करावयाचें तर तें बाष्पस्नान करावयाचें. यावर या शेतकऱ्यांचा विशेष कटाक्ष होता. रशियांतील पुष्कळ खेड्यांतून अशीं सार्वजनिक स्नानगृहें बांधण्यांत आलीं होतीं. हिंवाळ्याच्या दिवसांत या स्नानगृहांत शिरून बाष्पस्नान करावयाचें व ताबडतोब बाहेर पडून बर्फावर लोळावयाचें. रशियांतील शेतकऱ्यांना ही गोष्ट आरोग्यकारक अशी वाटत असे. जर्मन शेतकऱ्यांची समजूत या बाबतींत अगदीं भिन्न होती. यामुळेंच ' रशियनाला जी गोष्ट आरोग्यदायक तीच गोष्ट जर्मनाला मरणाला कारणीभूत होणारी ' अशी म्हणच रशियांत प्रचलित आहे. रशियन शेतकरी देवभोळा असला तरी भिक्षुक वर्गासंबंधानें त्याला कधींहि फारसा आदर वाटत नव्हता हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. रोजची प्रार्थना, व्रतें, प्रायश्चित्तें, पापकृत्यांची कबुली, क्षमायाचना, विवाह, और्ध्वदेहिक वगैरे अनेक बाबतींत या वर्गाची शेतकऱ्यांना गरज लागत असे. भिक्षुक वर्गानें या सर्व धार्मिक कृत्यांना धंद्याचें स्वरूप दिलें होतें. रशियन शेतकरी ग्रीक अर्थाडॉक्स चर्चचे अनुयायी आहेत. या लोकांचीं धार्मिक कृत्यें करणारे भिक्षुक विवाहितही असत. अविवाहित भिक्षुकांचे व भिक्षुकिणींचे मठही ठिकठिकाणीं स्थापण्यांत आले होते. हे मठ चालविण्या-

करितां व गांवोगांवच्या प्रार्थनामंदिरांचा खर्च चालविण्याकरितां दरेक शेतकऱ्याच्या उत्पन्नांतील कधीं एकदशांश तर कधीं त्याहून थोडा जास्त कर धर्मखात्याला द्यावा लागत असे. या कराशिवाय भिक्षुकवर्ग खासगी रीतीनें शेतकऱ्यांकडून दक्षिणा उकळीत असे ती निराळीच. भिक्षुकवर्गाच्या या लुबाडणुकीच्या वृत्तीमुळें त्यांच्याबद्दल कोणालाही आदर वाटत नव्हता. भिक्षुक हा एक थट्टेचाच विषय बनला होता. या भिक्षुकांत मठवासी काळे डगलेवाले व चर्चमधून कामें करणारे सफेत डगलेवाले असे दोन प्रकार होते. हे दोन्ही प्रकारचे भिक्षुक समाजावर पोसले जात होते. हे लोक आत्मशांतीचें साधन सांगण्याऐवजीं बाह्य विधींचच स्तोम माजवीत. यामुळें त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या अनादरांत आणखी भरच पडे. प्रार्थनामंदिरांतून कामें करणाऱ्या पाद्र्यांतही दोन प्रकार होते. त्यांतल्या कांहीं पाद्र्यांना श्रीमंतांच्या घरच्या खासगी प्रार्थनामंदिरांतील धर्मकृत्यें चालविण्याकरितां नेमण्यांत येत असे. गांवचे पाद्री व घरगुती कामें करणारे पाद्री दोन्हीही मीरच्या सभासदांच्या व श्रीमंत मालकांच्या ताब्यांत असत. या लोकांपुढें पाद्र्यांना नमून रहावें लागत असे. गांवचे पुढारी व मालक लोक रस्त्यांत भेटले तर त्यांच्यापुढें पाद्र्यांनीं आपली टोपी काढून नमलेंच पाहिजे असा रिवाज होता. हा रिवाज कोणी मोडला तर त्याला कडक शिक्षाही करण्यांत येत असे. एकदां एका पाद्र्यानें आपल्या मालकाच्या घरावरून जात असतां टोपी काढली नाहीं, या अपराधावरून त्या पाद्र्याचे हातपाय बांधून त्याला एका पोत्यांत घालण्यांत आलें. पोत्याचें तोंड बांधून नंतर हें पोतें एका टेकडीच्या घसरणीवरुन खालीं सोडण्यांत आलें व तें खालीं वाहात असलेल्या नदीच्या तळाशीं जाऊन पोंचलें!

घरांत कोणी पाहुणे आलें कीं, श्रीमंत शेतकऱ्यांनीं आपल्या घरच्या भिक्षुकाला बोलावून आणावयाचें व थंडीचे दिवस असले तरी त्याची पर्वा न करतां आपल्या घरांतल्या डबक्यांत त्याला डुबक्या द्यावयाच्या व तो आरडाओरड करूं लागला म्हणजे खिदळावयाचें असे प्रकार या पाद्री लोकांच्या बाबतींत करण्यांत येत. धर्मखात्यावरील बिशप वगैरे अधिकारी श्रीमंतांच्याच बगलेंत असल्यामुळें पाद्री लोकांवर झालेल्या अत्याचारांकडे कोणी लक्ष देत नसे. सामान्यतः हा सर्व भिक्षुक वर्ग समाजांत अप्रिय झालेला असल्यामुळें त्याच्याशीं कोणी कसेंही वर्तन केलें तरी त्यांकडे लक्ष देण्यांत येत नसे. रशियांतील भिक्षुक वर्ग याप्रमाणें तिरस्कृत व अप्रिय असला तरी तो वर्ग ज्या देवाची प्रार्थना करावयास सांगत असे त्याच्यावर मात्र शेतकऱ्यांची अत्यंत श्रद्धा होती. प्रार्थना केल्यानें हा देव आपल्याला पावतो अशी त्यांची भावना होती. आपली कामना मग ती कोणत्याही प्रकारची असो ती तो सफल करतो असा त्यांचा विश्वास होता. यामुळें चोरी वगैरे एकादें दुष्कृत्य करण्यापूर्वीं त्यांत आपल्याला यश मिळावें म्हणून प्रार्थना करण्यांत येत असे. सेंट पीटर्सबर्गमधील आस्ट्रियन वकिलातींतील एका तरुण अधिकाऱ्यावर हल्ला करून त्याला लुटण्याचें कांहीं शेतकरी चोरांनीं ठरविलें. पण या कामावर जाण्यापूर्वीं ते प्रथम चर्चमध्यें गेले व आपल्या कृत्यांत यश मिळण्याबद्दल त्यांनीं देवाची प्रार्थना केली. पुढें या वकिलातींत शिरून त्यांनीं त्या अधिकाऱ्याला ठारहीं केलें. या चोरांना एकाद्या चर्चमधील मूर्तींवर जडविलेलीं रत्नें काढून घ्यावयाचीं असलीं तर एक रुबल किंमतीच्या मेणबत्त्या तेथील संतांच्या धडग्यापुढें ते जाळीत व नंतर संधी साधून त्या मूर्तींना ते लुबाडीत असत.

रशियांतील त्यावेळच्या शेतकऱ्यांना देव व स्वर्गस्थ साधुसंत पाहिजे होते, पण ते आपल्या फायद्याकरितां पाहिजे होते. या देवांच्या व साधुसंतांच्या नांवांखालीं आपल्याला लुबाडणारे भिक्षुक मात्र त्यांना नको होते. रशियन शेतकरी स्वभावानें रुक्ष आहे. त्याला फक्त व्यवहार कळतो. जीवनांत काव्य आहे, प्रेम आहे हें त्याला कांहीं कळत नाहीं. बायको केली तरी तो ती घरांत व शेतावर राबण्याकरितां एक मनुष्य पाहिजे म्हणून करील, तिच्याकडून तो मरेसरेतों काम घेतो. तिला आपल्या धाकांत ठेवतो व प्रसंगीं तिला झोडपूनही काढतो. त्यावेळचें नव्हें तर अगदीं क्रांतिपूर्वकालापर्यंतचें रशियांतील शेतकरी स्त्रीचें जीवन अत्यंत कष्टमय होतें. नवऱ्याची भीति तिच्या डोळ्यांसमोर सदैव उभी असे. रशियांतील शेतकऱ्यांच्या जीवनांत काव्य नाहीं, प्रेम नाहीं त्याचप्रमाणें त्यांत आत्मिक उदात्तताही नाहीं. केवळ संसारी व स्वार्थी वृत्ति हेंच त्याच्या जीवनांतील रहस्य आहे. आणि प्राचीन काळच्या रशियन शेतकऱ्याची परिस्थिति व जीवन असेंच असणें स्वाभाविक होतें उत्तररशियांतील जमीन बहुशः नापीक व रुक्ष होती. दक्षिणरशियांतील जमीन काळी व पिकाऊ असली तरी वेळेवर पाऊस न पडल्यामुळें तींतही पाहिजे इतकें पीक येत नसे. या भागांतून पुष्कळ नद्या वाहत असल्या तरी त्यांचे कालवे काढण्याची व त्यांच्या पाण्याचा उपयोग करण्याची युक्ति जोंपर्यंत कळली नाहीं तोपर्यंत या नद्यांचा उपयोग तरी काय? यामुळें रशियन शेतकरी नेहमीं दुष्काळग्रस्त असावयाचा. शेतांत भरपूर धान्य पिकलें आहे असे प्रसंग क्वचितच यावयाचे. या परिस्थितीला दुसरींही अनेक कारणें होतीं. रशियन शेतकऱ्याची त्यावेळचीं शेतीचीं आउतें अगदीं साधीं होतीं. खताचा उपयोग

करण्याचें त्यांना माहीत नव्हतें व जनावरांची जोपासना कशी करावी व त्यांची अवलाद कशी सुधारावी याचेंही फारसें ज्ञान त्याला नव्हतें. दरसाल सेंट जॉर्ज दिनाचे प्रसंगीं (एप्रिल २३) गुरांना कोठारांतून बाहेर उजेडांत आणण्यांत येई. गुरें याप्रमाणें बाहेर काढलीं म्हणजे पाद्री त्यांच्यावर पवित्र पाणी शिंपडी व हा विधी झाल्यावर हीं गुरें कामाला लायक झालीं असें समजण्यांत येई. शेतकऱ्यांचीं हीं गुरें कधींही लठ्ठ असावयाचीं नाहींत. यावेळची त्यांची अवस्था तर शोचनीयच असावयाची. सर्व हिंवाळाभर त्यांना कोंदट भुयारांतून कोठारांतून कोंडून ठेवीत असत व वाळल्या गवताशिवाय त्यांना कांहीं खावयास मिळत नसे. अशा स्थितींत या गुरांच्या अंगांत केवळ आस्थिचर्म राहिलें तर त्यांत कांहींच आश्चर्य नाहीं. कामाकरितां बाहेर काढिलेलीं हीं जनावरें रोड व अशक्त असत. यांपैकीं कांहीं लंगडीं असत व कांहींना जागेवरून उठतांही येत नसे.

त्या वेळचा रशियांतील शेतकरी अडाणी होता, त्याचीं आउतें ओबडधोबड होतीं, खतांचा उपयोग त्याला माहीत नव्हता, जनावरांची जोपासना कशी करावी हेंही त्याला माहीत नव्हतें, तथापि हा वर्ग आपल्याला उपलब्ध असलेल्या सर्व उत्पादन-साधनांचा सामुदायिक रीतीनें उपयोग करीत असे व त्याचा फायदाही त्याला सामुदायिक रीतीनेंच घेतां येत असे. त्याच्या श्रमाचें योग्य फल त्याला परत मिळत असे. त्याचें श्रमफल कोणी लुबाडीत नसे, तो स्वतंत्र असे व दुष्काळादि आपत्तींना त्याला तोंड द्यावें लागत असलें तरी निसर्गाशीं याप्रमाणें झगडण्यांतच त्याला एक प्रकारचा आनंद वाटत असे. पण शेतकऱ्यांचें हें स्वातंत्र्य व त्यांच्या संसारांतील समाधान यापुढें टिकून राहिलें नाहीं.

सरंजामदार व कुळें

प्राचीन कालीं सुरूं असलेली समाजसत्तात्मक सामुदायिक शेती करण्याची पद्धति नष्ट होत जाऊन त्या ठिकाणीं सरंजामदारी पद्धति कशी रूढ झाली हें सांगत बसण्याची ही जागा नाहीं. मध्ययुगांत ज्या अनेक उलाढाली झाल्या त्यामुळें मूळच्या समाजसत्तात्मक रचनेला धक्का बसला एवढें मात्र या बाबतींत सांगतां येईल. मनुष्यसमाज सामुदायिकपणें शेती करून राहूं लागला. निरनिराळ्या देशांत ठिकठिकाणीं तो स्थिरतेनें राहूं लागला. त्याचे निरनिराळे गट बनत चालले. त्यांच्यांत लहान-लहान गट बनत चालले. त्यांच्यांत लहानलहान राज्येंही अस्तित्वांत येऊं लागलीं. याप्रमाणें मानवी समाजाची एका बाजूनें प्रगति होत होत होती तर पूर्वीच्या शिकार करून राहणाऱ्या टोळ्यांतील अवशेष राहिलेल्या क्षात्रस्वभावी फिरत्या टोळ्यांनीं या प्रगतीचा जणूं काय विध्वंसच करण्याचें ठरविलें होतें. या कालांत केवळ आशियाच्या मध्यभागांतूनच नव्हे तर युरोपांतील उत्तर व मध्य भागांतून राहणाऱ्या या टोळ्यांनीं स्थिर होत चाललेल्या मनुष्यसमाजाच्या वस्तीवर व त्याच्या लहानमोठ्या राज्यावर हल्ले चढविण्यास सुरुवात केली. पावसाळ्याच्या दिवसांत अशा प्रकारच्या स्वाऱ्या करणें अशक्य असतें म्हणूनच केवळ चार महिने या टोळ्या कोठेंतरी विश्रांति घेत व बाकीच्या आठ महिन्यांत युरोपच्या व आशियाच्या या टोकापासून त्या टोकांपर्यंत धुमाकूळ घालीत व लुटालूट करीत हे लोक फिरते असत. गॉल, गाथ, स्कॅन्डेनेवियन, फ्रँक, हूण, शक, शबर, टार्टार, मोंगल अरब वगैरे अनेक टोळ्यांनीं लुटालूट करावयाची व तरवारीच्या

जोरावर आपलीं उपजीविकेचीं व उपभोगाचीं साधनें मिळवावयाचा असा धंदा कित्येक वर्षे चालविला होता. या टोळ्यांचे नायक स्वाऱ्या शिकारीवरून परत आल्यावर पाडाव करून आणलेला आपल्या जवळचा माल पुन्हा निरनिराळ्या वस्तींत जाऊन विकीत असत. या पाडाव केलेल्या मालांत पुष्कळ पुरुष व स्त्रियांही असत. या स्त्रियांपकीं तरुण व सुंदर स्त्रिया हे नायक आपल्याकरितां ठेवून घेत, कांहीं पुरुषकैद्यांनाही आपल्या टोळींत गुलाम म्हणून घेत व बाकीच्या स्त्रीपुरुषांना इतर लुटीच्या जिनसाप्रमाणें विकून टाकीत. यामुळें त्यावेळच्या मनुष्यसमाजांत गुलामांचा एक नवीनच वर्ग निर्माण झाला, या फिरत्या टोळ्यांच्या हल्ल्यांतच खुद्द शेती करणाऱ्या निरनिराळ्या टोळ्यांतूनही झालेल्या आपसांतील लढायां-ची भर पडत असे या लढयांत यशस्वी झालेला पक्ष दुसऱ्याच्या जमीनी त्याची चीजवस्त आपल्या मालकीची करी, व त्याबरोबरच दुसऱ्या टोळींतील स्त्रीपुरुषांनाहीं पाडाव करून आपल्या टोळींतील गुलामांच्या संख्येंत भर टाकी. या मध्ययुगीन धुमाकुळीच्या व धामधुमीच्या कालांत जे शेती करून राहणारे समाज व जीं शेती-प्रधान राष्ट्रें मध्यवर्ती सत्ता प्रस्थापित करूं शकलीं तीच या वारंवार होणाऱ्या परचक्राला तोंड देऊं शकलीं. रशियांतील झारांची सत्त ही युरोपांतील त्यावेळच्या मध्यवर्तीं राज्यसत्तापैकींच एक सत्ता होती. टार्टार, मोंगल, कोसॅक, कॉकेशस पर्वतांतील रानटी टोळ्या रशियावर स्वाऱ्या करूं लागल्या तेव्हां त्या वेळच्या झारांनीं आपल्या हाताखालच्या सरदारांच्या बळावर या हल्ल्यांना यशस्वी रीतीनें तोंड दिलें. सालोसाल येणाऱ्या या टोळ्यांच्या हल्ल्यांना तोंड देण्याकरितां झारांना सतत तयारी ठेवावी लागे. तेव्हां या सरदारांना त्यांनीं ठिकठिकाणीं मोठमोठ्या जमिनी इनाम दिल्या

व कांहीं सरदारांना तर गांवेचीं गांवें इनाम दिलीं. केवळ रशिया-पुरतेंच बोलावयाचें म्हणजे सरंजामशाहीला रशियांत वरीलप्रमाणें सुरुवात झाली असें म्हणावयास हरकत नाहीं. सरदारांना जमीनी दिल्या, पण या जमिनी कसावयाच्या कोणी ? गांवाखालीं असलेल्या मीरच्या ताब्यांतील जमिनी सामुदायिक रीतीनें कसण्यांत येत असत. गांवांतील कुटुंबांना दिलेल्या जमिनी तीं तीं कुटुंबें लागवडीस आणीत. तेव्हां या सरदारांना जमिनी देतांना त्यावर मेहनत करणारे शेतकरीही त्यांना मिळाले पाहिजेत याचा विचार झारला करावा लागला व जमिनी देतांना अमुक इतक्या शेतकरी कुंटुबांनीं या सरदाराच्या जमिनी कसल्या पाहिजेत असेही हुकूम झारला त्यावेळीं द्यावे लागले. अशा रीतीनें रशियांतील कुळवाडी-गुलामगिरीचें याच वेळीं बीजारोपण झालें.

रशियांत यावेळीं खेडेगांवांतील जनसमाजांत तीन ठळक वर्ग पडले होते. पहिला वर्ग गुलामांचा होता. हा वर्ग संख्येनें फारच मोठा होता. युद्धकैदी, दिवाळखोर व गुन्हेगार या लोकांनीं या संख्येंत पुष्कळच भर टाकली होती, दुष्काळ, वावटळी, रानटी टोळ्यांच्या वारंवार होणाऱ्या स्वाऱ्या यांनीं गांजून गेलेले व उपासमारीच्या स्थितीला पोंचलेले लोक स्वतः होऊनच गुलामांच्या बाजारांत आपल्याला गुलाम म्हणून विकून घेत, त्यांचीही भर या गुलमांत पडली होती. स्वतंत्रपणें शेतावर राबणारे लोक दुसऱ्या वर्गांत पडत व ज्यांना वास्तविकपणें शेतकरी म्हणतां येईल अशा लोकांचा तिसरा वर्ग होता. पण रशियांत या कालांत जसजशी सरंजामशाहीची वाढ होऊं लागली तसतसे हे सर्व वर्ग लुप्त होऊं लागले. बलिष्ट होत चाललेल्या जमीनदारांनी व सरदारांनी या सर्व वर्गांतील लोकांना कुळवाडीगुलाम बनवून सोडलें. जमिन-

दारांच्या जमिनीप्रमाणें हे कुळवाडीही त्या इस्टेटीच्या भागां-पैकींच एक भाग आहेत असें समजण्यांत येऊं लागलें. जे कुळवाडी जमिनदारांच्या ताब्यांत नसत त्यांना सरकारच्या माल-कीचीं कुळें असें समजत व अधिकारी लोक या कुळांना कोणीही जमिनदाराच्या स्वाधीन करीत. आपल्याजवळ असलेलीं कुळें घरगुती नोकरही मालक लोक दुसऱ्या जमिनदारांना विकून टाकीत. या कुळवाड्यांचीं व नोकरांचीं कुटुंबेंच कुटुंबें हे मालक दुसऱ्यांना विकीत इतकेंच नव्हे तर मायलेक, पतिपत्नी यांची ताटातूट करून या लोकांची विक्री करण्यांत येत असे, सरदार, जमीनदार व स्वतंत्र शेतकरी यांच्या वाढत्या शेतकीचीं कामें करणाऱ्या मजुरांची अत्यंत आवश्यकता होती. जमिनीचे मालक वाढत चालले होते. पण आपल्या ताब्यांतल्या जमिनी लागवडीला आणावयाच्या तर शेतावर कामें करणाऱ्या मजुरांचा तुटवडा पडत चालला होता. मजूरबाजारांत मजुरांना मागणी फार व पुरवठा कमी अशी परिस्थिति त्यावेळीं निर्माण झाली होती. या बाजारांत गिऱ्हाइकांमध्यें जोराची स्पर्धा चाले. जमिनींचे मालक म्हणजे त्या काळचे भांडवलदारच बनले होते. काळ्या माईची मेहनत मशागत करणाऱ्या शेतकऱ्यांचीं कुटुंबेंच्या कुटुंबें बाजारांत आणून विकण्यांत येत. अशा प्रकारची पद्धति रशिया-शिवाय त्यावेळच्या जगांत दुसरीकडे चालू नव्हती. या पद्धतीला आळा घालण्यास त्यावेळचें रशियांतील सरकार मुळींसुद्धां तयार नव्हतें, उलट एखाद्या कुळानें आपल्यावर होणाऱ्या जुलमा-विरुद्ध सरकारकडे अर्ज केला तर त्याकडे सरकारी अधिकारी लक्ष देत नसत आणि मालकांना या गोष्टीचा पत्ता लागला कीं, असल्या कुळांना ते चाबकाखालीं बडवून काढीत. आपलें एके

ठिकाणीं जमलें नाहीं तर दुसरीकडे जाऊन शेती करावी व पोट भरावें अशा प्रकारची स्वतंत्रता या कुळवाडी गुलामगिरीच्या दिवसांत नष्ट झाली. आपलें गांव सोडून शेतकऱ्यांना दुसरीकडे कोठेंही जाण्याची बंदी झाली. आपल्या शेतावर पोट भरत नसेल तर उपासमार सहन करून अन्नानें टांचा घासीत मरावें किंवा आपल्या पोराबाळांसकट गुलामांच्या बाजारांत जाऊन स्वतःला विकून घ्यावें असा प्रसंग रशियन शेतकऱ्यांवर येऊन ठेपला. एकाद्या शिलेदाराला सरकारनें कांहीं एकर जमीन व ती कसणारीं दहा कुटुंबें इनाम दिलीं व या कुटुंबापैकीं पांच कुटुंबें दुसऱ्या जमिनदाराकडे निघून गेलीं तर आपली अर्धी इस्टेटच नाहींशी झाली असें तो समजत असे. तिची नुकसानभरपाई करून देण्या-बद्दल या जमिनदाराविरुद्ध तो सरकारी कोर्टांत खटला भरीत असे. हा खटला अर्थात् पहिल्या शिलेदाराच्या बाजूचा होई. दुष्काळानें इतर आपत्तींनी गांजलेले मौझिक (शेतकरी) या आपत्तींतून मुक्त होण्याकरितां भरमसाट कर्ज काढीत. हें कर्ज आपल्या हातून फिटेल कीं नाहीं याचा विचारही ते कधीं करीत नसत. कर्जापायीं अर्थात् त्यांची जमीन सावकार आपल्या ताब्यांत घेई. आणि ज्याला गावांत जमीन नाहीं त्याला कोणीही गुलाम म्हणून विकत घ्यावें अशी रूढी असल्यामुळें या गुलामानें कितीही तक्रार केली तरी त्याच्याकडे कोणीही लक्ष देत नसे.

पीटर दी ग्रेट उदार अंतःकरणाचा झार खरा पण ही कुळांची गुलामगिरी त्यानें बंद केली नाहीं. राज्यांतील प्रत्येक व्यक्तीनें सरकारची सेवा बजावलीच पाहिजे असा त्याचा दंडक होता. व जे लोक याप्रमाणें सरकारची सेवा बजावीत नव्हते त्यांच्यावर त्यानें डोइपट्टी लादली होती. गुलाम, घरगुती नोकर, शेतावर

राबणारे मजूर हे लोक डोईपट्टी देण्यास असमर्थ आहेत, असें समजलें जाई. तेव्हां अर्थात् हे लोक ज्यांच्याकडे कामावर असत त्यांना ही डोईपट्टी भरावी लागे. आपल्या शेतावर राबणाऱ्या कुळांची डोईपट्टी भरावी लागल्यामुळें हे जमिनदार जनावरांपेक्षांही या कुळांना अधिक निर्दयतेनें वागवीत. अर्थात् शेतांत काम करणाऱ्या जनावरांपेक्षांही त्यांची किंमत कमी झाली होती.

सरकारचे अमानुष कडक कायदे व जमिनदारांनीं त्यांचा फायदा घेऊन कुळांवर चालविलेले अन्याय यांचा व्हावा तोच परिणाम झाला. रशियांतील शेतकरी समाजांत भयंकर असंतोष पसरला. व त्यांनीं ठिकठिकाणीं भयंकर दंगे केले. जमिनदारांचे खून केले, त्यांचे वाडे जाळून टाकले, धान्याच्या कोठारांनाही आगी लावल्या. शेतकऱ्यांचें हें बंड जवळजवळ सर्व देशभर पसरलें होतें. फ्रान्स व जर्मनीमधील शेतकऱ्यांनीं यापूर्वी जीं बंडें केलीं तशाच प्रकारचे दंगेधोपे यावेळीं रशियांतील असंतुष्ट शेतकऱ्यांनीं केले. झारांच्या लष्करी शिपायांनीं या बंडवाल्यांचा लवकरच निःपात केला खरा, पण तिसऱ्या पीटरनें शेतकरी समाजांतील असंतोष कमी करण्यासाठीं व सरदारांची व जमिनदारांची अरेरावी सत्ता कमी करण्यासाठीं १७६२ सालीं एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. प्रत्येक सरदारानें व शिलेदारानें वर्षांतून अमुक एक दिवस सरकारची नोकरी बजावलीच पाहिजे ही त्याच्यावरील सक्ती रद्द करण्यांत आली असल्याचें या जाहीरनाम्याच्या द्वारें प्रसिद्ध करण्यांत आलें होतें. सरदारांनीं सरकारी नोकरी केलीच पाहिजे ही सक्ती रद्द करण्यांत आल्यावर अर्थातच शेतकऱ्यांनीं या जमिनदारांच्या जमिनी कसून दिल्याच पाहिजेत अशी सक्तीही त्यांच्यावर करतां यावयाची नाहीं हें उघड होतें.

तिसरा पीटर एवढ्यावरच थांबणार नाहीं, कुळांवर लादण्यांत आलेली सक्तीची गुलामगिरी नष्ट करण्यांत आली आहे असा जाहीरनामाही तो लवकरच प्रसिद्ध करील अशी आशा शेतकऱ्यांना वाटत होती, पण हा जाहीरनामा प्रसिद्ध झाला नाहीं. हा दुसरा जाहीरनामा झारच्या सरदारांनीं मधल्यामध्येंच दाबला असला पाहिजे अशी शेतकऱ्यांची समजूत झाली व या निराशेमुळें पुन्हां कांहीं ठिकाणीं शेतकऱ्यांचे दंगे झाले. तिसऱ्या पीटरला यानंतर पदच्युत करण्यांत आलें व त्याचा खूनही झाला. कुळवाडी गुलामगिरी नाहींशी करूं इच्छिणारा हा उदार अंतःकरणाचा झार शेतकऱ्यांच्या उद्धाराचें कार्य करीत असतां सरदारांच्या रोषाला बळी पडला. तिसरा पीटर याप्रमाणें गुलाम कुळांच्या दृष्टीनें हुतात्मा ठरला. पीटरच्या खुनानंतर एक तोतया पीटर पुढें आला. या तोतयानें झपाट्यासरशीं डॉन नदीकांठच्या जमिनदारांची सर्रास कत्तल उडविली. शेतकऱ्यांचें प्रेम संपादण्याकरितां त्यानें हें कृत्य केलें खरें, पण त्याच्या या क्रूर व अमानुष कृत्यामुळें त्याला मदत करूं इच्छिणाऱ्या लोकांच्या मनांतून तो उतरला. रशियांत शेतकऱ्यांचें राज्य प्रस्थापित करावयाचें असाही त्यानें आपला बेत जाहीर केला, पण एवढी मोठी क्रांति करण्याची कुवत व अक्कल त्याच्या ठिकाणीं नव्हती हेंच शेवटीं दिसून आलें. या तोतयानें यापुढेंही आणखी कांहीं चुका केल्या, पुष्कळ ठिकाणीं त्याचा पराभवही झाला. शेवटीं त्याला कैद करण्यांत आलें व हें तोतयाचें बंड लवकरच मोडण्यांत आलें.

दुसऱ्या कॅथेराइन राणीच्या कारकीर्दीत कुळांवर लादलेल्या या गुलामगिरीच्या अन्यायाची परमावधि झाली. मालकाच्या स्थावर इस्टेटीचाच 'कुळें' हा एक भाग आहे असें कायद्यानें

ठरविण्यांत आलें. कुळें हीं मालकांचें खेळतें भांडवल आहे असें समजून शेंकडोंनींच काय तर हजारोंनीं त्यांची खरेदीविक्री करण्यांत आली. कुळांची अशी देवघेव करतांना त्यांच्याबरोबर जमीन देण्यांत येत असेंच असें नाहीं. सगळीं कुटुंबेंच्या कुटुंबें कधीं विकलीं जात किंवा वैयक्तिक रीत्याही हा व्यवहार करण्यांत येई. एकाद्या जमिदाराचें उत्पन्न काय आहे, त्याची इस्टेट किती आहे याचा अंदाज करावयाचा असल्यास त्याच्यापाशीं कुळांचीं किती कुटुंबें आहेत याचा विचार करण्यांत येई. असुक इतक्या आत्म्यांवर जमिनदाराचा मालकी आहे असें सांगण्यांत येऊं लागलें. पण ही स्थिति फार दिवस टिकली नाहीं. अठराव्या शतकाच्या अखेरीस या प्रश्नानें पुन्हां एकदां उलट खाल्ली. कुळांवर होत असलेल्या अन्यायांना आळा बसावा म्हणून पॉल बादशहानें या बाबतींत एक हुकूम काढून आठवड्यांतून तीन दिवसांपेक्षां जास्त दिवस कोणत्याही जमीनदारानें कुळांकडून काम घेतां कामा नये, असा हुकूम जाहीर केला. सरदार जमिनदार हे राज्यांतील पोलिसच्या जागीं आहेत असें मी मानतों. तथापि त्यांच्या सत्तेलाही मर्यादा घालणें आवश्यक झालें आहे असें जाहीरनाम्यांत म्हटलें होतें. १८०१ सालीं पहिल्या अलेक्झांडरच्या राज्यारोहणानंतर कुळांची मुक्तता करण्यासंबंधानें अनेक योजना करण्यांत आल्या. निकोलसच्या कारकीर्दींत या प्रश्नाचा विचार करण्याकरितां सहा कमिट्या नेमण्यांत आल्या पण या सर्व प्रयत्नांचा प्रत्यक्ष असा फारसा परिणाम झाला नाहीं. जमिनी इनाम देतांना पूर्वीं कुळांच्या कुटुंबांसकट त्या देण्यांत येत असत. पण ही पद्धत यापुढें बंद करण्यांत आली. कांहीं किरकोळ बाबतींत मालकांच्या अधिकारावर नियंत्रण घालण्यांत आलें, मालक-

वर्गापैकीं अत्यंत जुलमी वृत्तीच्या लोकांकडून त्यांच्या इस्टेटी काढून घेण्यांत आल्या, कांहींना सैबेरियांत हद्दपार करण्यांत आलें व कांहीं हजार कुळांना गुलामगिरींतून मुक्त करण्यांत आलें. वरील कमिट्यांच्या प्रयत्नांमुळें याप्रमाणें कांहीं सुधारणा झाल्या व कांहीं कुळांना स्वातंत्र्यही मिळालें पण कुळांवर होत असलेल्या जुलमांच्या बाबतींत तक्रार करण्याचाही हक्क जोंपर्यंत त्यांना दिलेला नव्हता व कुळवाडी पद्धति ही राज्यकारभारांतील एक महत्त्वाची बाब आहे असें जोंपर्यंत समजण्यांत येत होतें, तोंपर्यंत वरील सुधारणांचा कांहींच उपयोग नाहीं असाच कुळांचा समज झाला व तो खराही होता. जमीन कसण्याकरितां एकदां मालकानें कुळें आपल्या ताब्यांत घेतलीं कीं, त्यांच्या श्रमावर तर त्याचा पूर्ण हक्क असेच, पण हे श्रम करून त्यांना जी मजूरी मिळत असे त्यांतलाही कांहीं हिस्सा तो मागत असे. शिवाय कुळानें कोंबड्या व शेळ्या पाळल्या असतील तर कोंबड्यांचीं कांहीं अंडीं व कोंबडीचीं पिलें व कोंकरें त्यानें मालकाला पोंचविलींच पाहिजेत. आपल्या खासगी वेळांत व जागेंत त्यानें कांहीं भाजीपाला लावला असेल तर त्यांतीलही कांहीं हिस्सा, तसेंच करवंदें, तागाचें कापड या सर्व जिनसा कुळांनीं मालकांना पोंचविल्या पाहिजेत अशी सक्त ताकीद असे. एकादे वेळीं आपल्या शेतावर काम नसलें व कुळांना दुसऱ्याच्या शेतावर काम करावें लागलें तर या कामाबद्दल मिळालेल्या मजूरीपैकीं कांहीं निश्चित हिस्सा मालक त्यांच्याकडून वसूल करीत असे.

कुळांवर जुलूम करणाऱ्या मालकांचे ठोकळ मानानें पुढीलप्रमाणें चार वर्ग होते. (१) इस्टेटीवर स्वतः देखरेख ठेवणारे, (२) पेन्शनर अधिकारी (३) शहरांत राहून जमिनींचा

कारभार पाहणारे, (४) सट्टेबाजीनें जमिनींचें उत्पन्न खरेदीं करणारे. यांपैकीं पहिल्या वर्गांतले जमिनदार खुद्द स्वतःच इस्टेटीची व्यवस्था पहात असल्यामुळें आपलें उत्पन्न कसें वाढवावयाचें इकडे त्यांचें लक्ष असे व त्याकरितां कुळांचा अनन्वित छळ करावयाचा एवढेंच त्यांना माहीत होतें. दुसऱ्या वर्गांतले पेन्शनर वतनदार बहुशः लष्करी नोकरींतून निवृत्त झालेले असत. या अधिकाऱ्यांचें लक्ष इस्टेटीच्या उत्पन्नापेक्षां इस्टेटीच्या व्यवस्थेकडे असे. आपल्या इस्टेटीचा सर्व कारभार अगदीं टापटिपीनें व शिस्तीनें झाला पाहिजे असें त्यांना वाटत असे व याकरितां आळसानें वागणाऱ्या व शिस्त मोडणाऱ्या कुळांना ते शारीरिक शिक्षाही देत असत. ही शिक्षा देत असतांना ते कधींच दयामाया ठेवीत नसत. शहरांत राहणाऱ्या वतनदारांचा खर्च नेहमींच अव्वाच्या सव्वा असावयाचा, तेव्हां आपल्या इस्टेटीवर देखरेख ठेवणाऱ्या मुनीमाकडून दरसाल अधिकाधिक उत्पन्नाची मागणी ते करीत असत आणि असा वसूल त्यानें न केल्यास त्याला किंवा त्याच्या मुलाला सक्तीनें लष्करांत पाठविण्याची धमकी ते त्याला देत असत. यामुळें साहजिकच हा मुनीम इस्टेटीवर काम करणाऱ्या कुळांवर अनेक प्रकारचे जुलूम करीत असे. शेवटल्या जमीनदारांचा वर्ग म्हणजे सट्टेबाज सावकारांचा वर्ग होय. वतनदारांना वेळोवेळीं कर्ज पुरवून या कर्जफेडीच्या पायीं इस्टेटीच्या-इस्टेटी गडप करणारे सावकार जमीनदारही याच वर्गांत मोडत. इस्टेटीच्या जमिनींतून पैसा काढण्याकरितां ते भल्याबुऱ्या सर्व उपायांचा अवलंब करीत. शेवटल्या वर्गांतले हे मालक अतिशय क्रूर व पाशवी वृत्तीचे असत. इस्टेटीवर राबणाऱ्या कुळांना रात्रंदिवस झोडपून काम करून घ्यावयाचें एवढेंच त्यांना माहीत

होतें. कुळांच्या हितानहितासंबंधानें ते मुळींच काळजी करीत नसत. तसेंच आपण सट्टयांत घेतलेल्या मालमत्तेचें पुढें काय होईल याचीही पर्वा करीत नसत. या इस्टेटीच्या जंगलांतील सागवानाचीं झाडें ते बेलाशक तोडीत. मालकांचीं शेतीचीं जनावरें सुद्धां ते हव्या त्या किंमतीला विकून टाकीत, कुळांकडून भरमसाट खंड वसूल करीत व खंडाचे पैसे न दिल्यास लष्करांत सक्तीनें भरती करण्याची त्यांना धमकी घालीत. त्यांत खाऊन-पिऊन सुखी अशीं कुळें आढळलीं कीं, त्यांना मुक्त करण्याचें आमिष दाखवून त्यांच्याकडून मोठमोठ्या रकमा घेत. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हे सट्टेवाले जमिनदार केवळ पैसा उकळण्याकडे दृष्टी ठेवीत व तसें करतांना कायदाबियदा ते मुळींसुद्धां ओळखीत नसत.

कुळांना तर केव्हांही कायद्याचें संरक्षण मिळत नसे. स्वतःच्या मनगटाचा जोर हीच त्यांची आत्मसंरक्षणाची ढाल. अशा परिस्थितींत उघडउघड बंडाचें निशाण उभारावयाचें हा एकच साधा उपाय त्यांना शिल्लक राहिला होता. पण या उपायाचा ते क्वचित् प्रसंगीं अवलंब करीत. कारण अनेक वेळां आलेल्या अनुभवानें ते शहाणे झाले होते व अशा प्रकारचा उपाय योजला तर लष्करी सत्तेच्या जोरावर या बंडाचा निःपात करण्यांत येतो व बंडवाल्यांना निष्ठुरपणानें शिक्षा देण्यांत येतात हें त्यांना माहीत होतें. यामुळें निःशस्त्र प्रतिकार, पलायन, जाळपोळ व खून या त्यांच्या आवडत्या व परिणामकारी उपायांचा ते अवलंब करीत. आपल्यावर आलेलीं संकटें व होत असलेले अन्याय धिम्मेपणानें सहन करीत राहणें हा रशियन शेतकऱ्यांत एक मोठा गुण आहे. निःशस्त्र प्रतिकार करण्याचें एकदां ठरविल्यावर बलिष्ठ

शत्रूपक्षानें आपल्यावर कितीही अत्याचार केले व ते कितीही दिवस केले तरी हुतात्म्याला साजेल अशा वृत्तीनें त्याला सारखें तोंड देत राहावयाचें अशी चिकाटी रशियांतील शेतकऱ्यांखेरीज युरोपांतील कोणत्याही समाजांत आजवर दिसून आलेली नाहीं. रशियन शेतकऱ्याच्या अंगीं असलेल्या या चिकाटीच्या गुणांमुळें जमिनींचे मालक–मग ते कितीही बलिष्ठ, कर्माकर्माचा विचार न करणारे–राक्षसी वृत्तीचे असोत, या शेतकऱ्यांच्या पुढें ते जेरीस येत. आपला मालक आपल्यावर अत्याचार करण्यास प्रवृत्त झाला आहे व आपल्याला तो लुबाडूं पाहात आहे, असें दिसून येतांच त्याच्या शेतावर काम करणारीं हीं रशियन कुळें तावडतोब आत्मसंरक्षणाच्या मार्गांचा अवलंब करीत. सपाट्यासरशी पहिल्यांदा आपल्याला जरूर नसलेलीं सर्व गुरें ते गुप्तपणें विकून टाकीत. तसेंच रोजच्या व्यवहाराला जरूर असलेल्या जिनसांखेरीज इतर सर्व जिनसांची व जंगम मालाची ते बाजारांत विल्हेवाट लावीत व या विक्रीमुळें आलेले पैसे ते आपल्या घराजवळच कोठें तरी गुप्त जागेंत पुरून ठेवीत. अशा प्रकारची एकदां तरतूद झाल्यावर मालकानें मग कितीही त्रास दिला किंवा छळ केला, तरी त्याची ते पर्वा करीत नसत. हा गुप्त ठेवा दाखवून देण्याकरितां मालक वर्गाचे लोक या निःशस्त्रप्रतिकारी शेतकऱ्यांचा अतोनात छळ करीत. लष्करांत जबरदस्तीनें भरती करण्याकरितां त्यांचीं तरुण मुलें ते घरांतून काढून नेत. पण या अत्याचारापुढें ते कधींही मान बाकवीत नसत. खंडणी भरून आपल्या मुलांना सोडवून आणण्याइतके पैसे आपल्यापाशीं नाहींत असे ते सांगत. आपल्याजवळ असलेला हा कुणबावा अशा प्रसंगीं आपण खर्चीं घातला तर आपल्यावर होत असलेले अन्याय तात्पुरते थांबतील

पण ते पुन्हां केव्हां सुरू होतील याचा नेम नाहीं, ही गोष्ट ते पूर्णपणें जाणून असत. आपल्यावर जुलम करणारा मालक 'कदाचित्' थकून जाईल. आपल्यां पाठी झोडपणारा मालकाचा हात 'कदाचित्' दुखून येईल असेंही त्यांना वाटत असे. याशिवाय या सर्व जाचांतून मुक्त होण्याकरितां ते कोठेंतरी गुप्तपणें लांबवर पळूनही जात. तरुण, सशक्त पुरुष व त्याचप्रमाणें स्त्रियांही या मार्गाचा अवलंब करीत.

मालकांच्या इस्टेटीवर राबणाऱ्या शेतकरी मजुरांत घरगुती मजुरांचाही एक मोठा वर्ग होता. या मजुरांची संख्या दिवसेंदिवस झटाट्यानें वाढत होती. या मजुरांकडून शेतीचीं कामेंही करून घेण्यांत येत पण मजुरीशिवाय दुसऱ्या कशावरही त्यांचा हक्क नसे. सामान्य माणुसकीच्या हक्कांनाही ते पारखे झाले होते. रशियांतील कुळांवर होत असलेल्या अन्यायांची व अत्याचारांची परमावधि झाली व या जुलमांपासून त्यांची मुक्तता करण्यांत आली पाहिजे अशी रशियांत सर्वत्र ओरड सुरू झाली. त्यावेळीं या कुळांची संख्या अंदाजें २,१६,२५,६०९ होती यापैकीं कुळें २,०१,५८,२३१ होतीं व घरगुती काम करणाऱ्या मजुरांची संख्या १४,६७,३७८ होती.

कुळांची मुक्तता

सामुदायिक रीतीनें स्वतंत्रपणें शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना कुळें बनवून रशियांतील जमिनदारांनीं आपलीं शेतें पिकवून घेण्याची प्रथा रूढ केली व झारच्या सरकारनेंही आपण निर्माण केलेल्या सरदारांना व इनामदारांना कायद्याची मदत केली. टार्टार मोंगलादि टोळ्यांच्या स्वाऱ्यांपासून रशियाचें संरक्षण करण्याकरितां रशियांत एक बलाढ्य मध्यवर्ती सत्ता प्रस्थापित झाली होती. या सत्तेनें आपल्या मदतीकरितां अनेक सरदार शिलेदार निर्माण केले होते. त्यांना मोठमोठ्या जमिनी व गांवें इनाम दिलीं होतीं व जमिनी कसण्याकरितां त्यांना पाहिजे त्या सवलतीही दिल्या होत्या. अशा रीतीनें रशियांतील एकतंत्री सत्तेनें योजलेला हा उपाय तात्पुरता यशस्वी झाला असें दिसलें खरें, पण गुलामगिरी, जबरदस्ती, अन्याय, जुलूम यांच्यावर उभारलेली ही पद्धति फार दिवस टिकूं शकली नाहीं. या पद्धतीमुळें शेतीचें उत्पन्न कमी झालें. देशांतील जनतेच्या पोषणाकरितां लागणारा धान्याचा पुरवठा कमी पडूं लागला. देशांतील उद्योन्मुख कारखान्यांना लागणारा कच्चा मालही या पद्धतीमुळें भरपूर मिळेनासा झाला. जनतेचें दैन्य, दारिद्र्य, उपासमार वाढत चालली. वास्तविक ज्यांच्या जिवावर या मालाचा पुरवठा व्हावयाचा तो शेतकरी वर्ग सर्व बाजूंनीं गांजून गेला. हतबल, निराश व असंतुष्ट झाला. आपल्यावर होणाऱ्या जुलमापासून व अत्याचारापासून आपली सुटका करून घेण्याकरितां जमिनदारांविरुद्ध व राजसत्तेविरुद्ध बंड करण्याची प्रवृत्ति त्यांच्यांत उत्पन्न झाली. देशांत सर्वत्र शेतकऱ्यांचीं बंडेंही होऊं लागलीं. एकोणिसाव्या शतकाच्या

मध्याच्या सुमारास रशियावर अनेक बाजूंनीं परचक्रें आलीं. देशांतील बहुजनसमाज वरीलप्रमाणें गांजलेला असल्यामुळें या परचक्रांना रशियाचें सरकार यशस्वी रीतीनें तोंडही देऊं शकलें नाहीं. अशा परिस्थितींत जनतेला हतबल, निराश व असंतुष्ट करणारी ही पद्धतीच नष्ट करण्यांत आली पाहिजे असें त्यावेळच्या झारच्या मनांत आलें. " शेतकऱ्यांना कुळें बनवून त्यांच्याकडून जमिनी पिकवून घेण्याची ही कुळवाडी पद्धति अरेरावी एकतंत्री सत्तेच्या जोरावरच सुरू करण्यांत आली आहे. तेव्हां या एकतंत्री सत्तेनेंच तिचा नायनाट केला पाहिजे. या पद्धतीमुळें गांजलेल्या जनतेनें असंतुष्ट होऊन ही पद्धत नाहींशी करण्यास तिनें सरकारास भाग पाडण्यापेक्षां वरूनच ती नाहींशी करण्याचे प्रयत्न होणें इष्ट आहे. आज चालू असलेली कुळवाडी पद्धति अशीच–तींत मुळींसुद्धां बदल न होतां–चालू राहणें केव्हांही शक्य नाहीं तेव्हां ती नष्ट करण्याची योजना कशी अमलांत आणावयाची याचा विचार सरदार मंडळींनीं केला पाहिजे." अशा आशयाचे विचार झारनें मास्को येथें आपल्या सरदारांपुढें प्रकट केले. झारच्या या भाषणाचा व्हावा तसा परिणाम झाला नाहीं. आपल्या सरदारांची बेपर्वाईची वृत्ति पाहून झारची निराशा झाली. लिथुआनिया प्रांतांत मात्र या प्रश्नाला निराळेंच स्वरूप प्राप्त झालें. मध्यंतरीं झारनें या प्रश्नाचा अभ्यास करण्याकरितां एक गुप्त कमिटीही नेमली होती. लिथुआनिया प्रांतांतील असंतुष्ट कुळांनीं तेथें केलेल्या चळवळीमुळें, व माजविलेल्या धुमाकुळामुळें तेथील सरदारांचें मत झारला अनुकूल असेंच बनत चाललें होतें. शेतकऱ्यांची गुलामगिरींतून मुक्तता होणें जरूर आहे, ही गोष्ट तिकडील सरदारांना पटलेली आहे हें पाहून झारला एकप्रकारचें

समाधान वाटलें. यानंतर कांहीं आठवड्यांनीं आपल्या या प्रयत्नांत ईश्वराच्या कृपेनें व सरदारांच्या सहकार्यानें यश येईल अशी आशा झारनें जाहीरपणें प्रकट केली. देशांतील वर्तमानपत्रांनीं झारच्या या मताला उचलून धरलें. ही कुळवाडी पद्धति म्हणजे राष्ट्राला लागलेला क्षयरोग आहे. राष्ट्ररूपी वृक्षाला लागलेली ही कीड आहे. या पद्धतिमुळें राष्ट्राच्या प्रगतीच्या आड भयंकर अडथळे उत्पन्न झाले आहेत. या गुलामगिरीच्या वातावरणांत देशाची नैतिक प्रगति होणें अशक्य झालें आहे. स्वातंत्र्यवादी राष्ट्रीय वृत्तीचे वर्तमानपत्रकार याप्रमाणें बोलूं लागले त्याप्रमाणें या पद्धतींतील दोष दाखविण्याकरितां अर्थशास्त्रज्ञही पुढें आले. देशाची औद्योगिक व व्यापारी भरभराट व्हावयाची असेल तर देशांतील मजूर वर्ग स्वतंत्र असणें जरूर आहे. नव्हे या वर्गाला पूर्ण स्वातंत्र्य असणें अपरिहार्य आहे असे ते म्हणूं लागले. रशियांतील एकतंत्री अरेरावी सत्ता नाहींशी होऊन त्या ठिकाणीं लोकसत्तात्मक राज्यपद्धति प्रस्थापित होण्यास देशांतील बहुजन समाजाची गुलामगिरी प्रथम नष्ट झाली पाहिजे असें राजकीय चळवळे बोलूं लागले व झारची वृत्ति बदलली असून राज्यघटनेंत सुधारणा करण्याचीही त्याची इच्छा आहे असेंही कांहीं राजकीय पुढारी सांगूं लागले.

परंतु जुन्या पिढीच्या सरदारांना ही कल्पना पसंत पडली नाहीं. रशियाचा शेतकरी स्वभावतः आळशी आहे. नव्या नव्या सुधारणा व शोध समजून घेऊन त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याइतकी हुषारी त्यांच्या ठिकाणीं नाहीं. त्यांच्यावर अधिकार गाजविणारा कोणीतरी खमक्या असला तरच त्याच्या हाताखालीं ते मुकाट्यानें राबतात. स्वतंत्रपणें राहून काम करण्याची त्यांची

योग्यताच नाहीं असें या जुन्या सरदारांचें मत होतें. पण हें जुनें मत कोणालाही पटणारें नव्हतें. आणि आपलें हें मत उघडपणें बोलून झारच्या मर्जीविरुद्ध जाण्याची कोणाही सरदाराची छाती नव्हती. कुळांच्या मुक्ततेच्या या चळवळीला आपण विरोध केला तर त्यांत आपलाच स्वार्थ दिसेल, आपण देशाभिमानी नाहीं असें लोक आपल्याला म्हणतील या शरमेनेंही कित्येक सरदार आपलीं मतें स्पष्ट न बोलतां या बाबतींत मूग गिळून बसले. झारच्या मनांत आलें तर ही गोष्ट तो केव्हांच करूं शकेल. सरदारदरकदारांच्या मतांची तो वाट पहात बसणार नाहीं. आपण विरोध केला तर झारची गैरमर्जी तेवढी पदरांत पडेल, झारच्या रोषास पात्र झाल्यावर त्याचे काय परिणाम होतील हेंही सांगतां यावयाचें नाहीं. बरें हे सर्व परिणाम सोसण्यास तयार झालें तरी त्यामुळें होणारी नुकसानी भरून निघेल असा फायदा होण्याची तर आशाच नाहीं. कारण या विरोधामुळें झारच्या रोषास आपण जसे पात्र होऊं तसेच जनतेच्या रोषासही आपण पात्र होऊं ही गोष्टही हे सरदार लोक पूर्णपणें जाणून होते. शेतकऱ्यांना गुलामगिरीची जाणीव झालेली आहे, तींतून मुक्त होण्याकरितां ठिकठिकाणच्या कुळांनीं आपल्या मालकांविरुद्ध शस्त्र उपसलें आहे, ज्या ठिकाणीं व ज्या प्रसंगीं सशस्त्र बंडें करून जमलें नाहीं त्या ठिकाणीं व त्या वेळीं निःशस्त्र प्रतिकाराचा, जाळपोळीचा व गुप्त खुनांचा मार्ग त्यांनीं पतकरलेला आहे, या सर्व आठवणी जुन्या मतांच्या सरदारांच्या मनांत ताज्या होत्या. त्यांतल्यात्यांत आपल्या मुक्ततेच्या बाबतींत खुद्द झारच अनुकूल आहे असें कुळांना समजलेलें असल्याबर त्यांना विरोध करणें म्हणजे दारूच्या कोठारांत बसून आगकाडीशीं खेळण्यासारखेंच,

हें ते जाणून होते. या परिस्थितींत हें मुक्ततेचें काम सरदार व जमिनदार वर्गाला बाजूला ठेवून सरकारी अधिकाऱ्यांनींच करण्यापेक्षां आपण स्वतःच तें केलेलें बरें, असेंही कांहीं सरदारांना वाटलें व प्रत्येक प्रांतांतील सरदार जमिनदारांनीं या प्रश्नाचा निर्णय करण्याकरितां स्वतंत्र कमिट्या स्थापन कराव्या असें ठरविलें व त्याप्रमाणें झारला तशी विनंतीही केली. ही विनंती अर्थातच मान्य झाली. प्रांताप्रांतांत सरदारांच्या कमिट्या नेमण्यांत आल्या पण या कमिट्यांनीं दिलेला निर्णय मात्र कुळांना फारसा अनुकूल असा नव्हता. रशियांत प्रचलित असलेली कुळवाडी पद्धति हळूहळू रद्द करण्यांत यावी असाच निर्णय या कमिट्यांनीं दिला. प्रत्येक गांवांखालच्या जमिनींपैकीं योग्य तो हिस्सा कुळांना दिला आणि या जमिनींवर ग्रामपंचायतींचा मालकी हक्क ठेवला म्हणजे हा प्रश्न आपोआपच सुटेल व सर्व सुधारलेल्या जगाला रशिया एक अनुकरणीय उदाहरण घालून देईल असें या कमिट्यांचें थोडक्यांत म्हणणें होतें. जमिनदारांच्या इस्टेटीशीं गांवपंचायतीच्या ताब्यांतील जमिनींचा कायमचा संबंध तोडून टाकावा. याशिवाय गांवच्या शिवेंत लागवडीला योग्य अशी जी जमीन असेल ती अनिर्णित कालपर्यंत मुक्त झालेल्या कुळांच्या ताब्यांत देऊन टाकावी असेंही कांहीं सरदार कमिट्यांचें मत होतें.

झारच्या सरकारचा या बाबतींतील निर्णय मात्र अगदीं स्पष्ट व निस्संदिग्ध होता. कुळांची मुक्तता या कल्पनेची झारनें केलेली व्याख्या कोणालाही चटकन् पटणारी अशी होती. जमिनदारांच्या ताब्यांतून कुळांना तावडतोड मुक्त करण्यांत यावें, या मुक्त झालेल्या शेतकऱ्यांचा एक स्वतंत्र वर्ग निर्माण करण्यांत यावा, या वर्गांतील प्रत्येक कुटुंबाला स्वतंत्र घर, त्याच्या भोंवती बाग

व पंचायतीच्या ताब्यांतील जमिनींपैकीं त्याच्या कुटुंबाच्या मानानें योग्य तो जमिनीचा हिस्सा त्याला देण्यांत यावा. ही योजना पूर्णपणें अमलांत आणावयाची असल्यास जमिनदाराच्या जमिनीवर राबणारें प्रत्येक कुळ व्यक्तिशः पूर्ण स्वतंत्र झालें आहे असें जाहीर करण्यांत यावें. या कुळांना दिलेल्या जमिनी व पंचायतीच्या जमिनी यांच्यांत निखालस विभागणी करण्यांत यावी. या दोन्ही जमिनींचा परस्परांशीं अगदींसुद्धां संबंध ठेवूं नये. गांवाच्या सीमेंतील पंचायतीच्या मालकीच्या जमिनीची किंमत व तिचे खंडाचें प्रमाण निश्चित करण्यांत यावें अशी झारची योजना, आणि या योजनेनुसारच अर्थात् कुळांच्या मुक्ततेचा कायदाही बनविण्यांत आला.

या कायद्यासंबंधानें आपलें मत देण्याकरितां प्रांताप्रांतांच्या जमिनदारांचें प्रतिनिधी बोलविण्यांत आले पण त्यांचें सुधारणावादी मत बाजूला ठेवण्यांत आलें जे सरदार सरकारी निर्णयाविरुद्ध आहेत असें आढळून आलें त्यांना समजावणी देण्यांत आली. कांहींच्या वतनदाऱ्या रद्द करण्यांत आल्या, या सरदारांपैकीं ज्यांनीं पुढारीपणा घेऊन सरकारला विरोध करण्याचें ठरविलें होतें त्यांपैकीं कांहींना हद्दपार करण्यांत आलें व कांहींना पोलिसच्या निगराणीखालीं ठेवण्यांत आलें. " आपण या प्रश्नाचा जो निर्णय ठरविला आहे त्यांत तत्त्वतः कोणताही बदल करतां यावयाचा नाहीं, तशा प्रकारचें मत प्रतिपादन करण्यास कोणासही परवानगी मिळावयाची नाहीं कारण रशियांतले कायदे एकतंत्री राज्यसत्तेमार्फतच होत असतात हें लक्षांत ठेवलें पाहिजे. " असें झारतर्फे स्पष्टपणें जाहीर करण्यांत आलें. ता. १९ फेब्रुवारी १८६१ रोजीं या मुक्ततेच्या कायद्यावर झारची सही घेण्यांत आली व दोन कोटींवर शेतकरी गुलामांना मुक्त करण्यांत आलें.

या कायद्यांत तीन महत्त्वाच्या तत्त्वांचा समावेश करण्यांत आला होताः—

(१) खेडेगांवांतील इतर वर्गांच्या नागरिकाप्रमाणें कुळांनाही सर्व स्वतंत्र नागरिकांचे हक्क ताबडतोब देण्यांत यावे व त्यांच्यावरील जमिनदारांचा ताबेहक्क नष्ट करून त्यजागीं यापुढें पंचायतीच्या स्वराज्यसरकारच्या ताब्यांत ते गेले आहेत असें समजावें.

(२) ग्रामपंचायतींच्या प्रत्यक्ष ताब्यांत ज्या जमिनी होत्या त्या त्यांनीं शक्य तितक्या आपल्या ताब्यांतच ठेवाव्या, याकरितां मालकांना कांहीं खंड द्यावा लागल्यास तो पैशाच्या किंवा मेहनतीच्या रूपानें देण्यांत यावा.

(३) या खंडभरतीच्या कामीं पंचायतींना कर्जाऊ रक्कम देऊन सरकारनें मदत करावी, दुसऱ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे ही जमीन खरेदी करून घेण्याच्या बाबतींत सरकारनें ग्रामपंचायतींना मदत करावी.

घरगुती नोकरचाकरांनीं आणखी दोन वर्षें मालक वर्गाची नोकरी करावी पण त्यानंतर ते स्वतंत्र आहेत असें समजण्यांत यावें पण गांवाखालच्या जमिनींत त्यांना कोणताही हिस्सा देण्यांत येऊं नये व त्यांनीं हक्कही सांगूं नये.

पोटभर अन्न, आंगभर वस्त्र व रहायला घर या मानवी जीवनाला अत्यंत आवश्यक अशा वस्तू स्वतंत्रपणें व थोड्या श्रमांत मिळाल्या पाहिजेत हेंच शेतकऱ्यांना पाहिजे होतें. जमिनदार व सरदार हे तर जमिनीचे हंगामी मालक होते. " तुम्ही मालक म्हणून आम्ही तुमचे खरें पण सर्व जमीन मूळची आमचीच आहे " अशीच प्रत्येक शेतकऱ्याची समजूत होती. शेतकऱ्यांची मुक्तता करावयाची तर मालक वर्गाच्या ताब्यांतील सर्वच्या सर्व

जमीन काढून घ्यावयास पाहिजे. तसें झालें नाहीं तर या मुक्ततेचें महत्त्व तें काय राहिलें? मुक्ततेचा कायदा केल्याबरोबर सर्व जमीन ग्रामपंचायतीच्या स्वाधीन करण्यांत येईल अशी आशा शेतकऱ्यांना वाटत होती पण ती खोटी ठरली. शेतकरी कुळें स्वतंत्र झालीं आहेत असें झारनें म्हटल्याबरोबर जुन्या मालकांच्या हाताखालीं आपल्याला कामें करावीं लागणार नाहींत अशी कुळांची साहजिकच कल्पना झाली. मुक्ततेचा जाहीरनामा वाचल्याबरोबर आपल्यावर कोणत्याही प्रकारची कामाची सक्ति करण्यांत येणार नाहीं असें कुळांना वाटलें पण या सर्व समजुती खोट्या ठरल्या. कुळांना स्वतंत्र करून त्यांना थोड्या जमिनी देण्यांत आल्या खऱ्या, पण जमिनदारांच्या जमिनी त्यांच्या ताब्यांत तशाच राहिल्या. या जमिनी कसावयाच्या कोणी? स्वतंत्र झालेल्या शेतकऱ्याशिवाय दुसरें कोण या जमिनींवर मेहनत मशागत करणार? अर्थात् मजुरी घेऊन मालकाच्या जमिनी पिकवावयास पाहिजेत, पण कांहीं ठिकाणच्या शेतकऱ्यांनीं हीं कामें करण्याचें नाकारलें. जमिनदारांच्या जमिनी पडीत ठेवणें तर शक्यच नव्हतें. इतके दिवस तुम्ही जमिनदारांचे गुलाम होता, ही गुलामगिरी आतां नष्ट झाली आहे, मालकांचे गुलाम तुम्ही आतां राहिलेले नाहीं. तथापि जमीनदारांच्या जमिनी पिकविण्यासाठीं तुम्ही यापुढें मजुरीचे गुलाम बनलें पाहिजे असें झारच्या सरकारचें अप्रत्यक्ष सांगणें होतें. ही गोष्ट ज्या शेतकऱ्यांना पटली नाहीं व ज्यांनीं जमिनदारांच्या जमिनींवर काम करण्याचें नाकारलें त्यांच्यावर कायदेशीर इलाज करण्यांत आले. या शिक्षेच्या सत्रांत कित्येकांना फटके मारण्यांत आले व कांहीं ठिकाणीं स्वतंत्र झालेल्या पण जमिनदारांच्या जमिनी कसण्यास

तयार नसलेल्या शेतकऱ्यांच्या जमावावर गोळीबारही करण्यांत आले. या लोकांचा बंदोबस्त करण्याकरितां ठिकठिकाणीं लष्करी तुकड्याही बोलवण्यांत आल्या. कुळांच्या मुक्तेचा कायदा झाला पण तो सर्वतोपरी कुळांना समाधानकारक नसल्यामुळें कांहीं ठिकाणीं वरीलप्रमाणें प्रतिकार करण्यांत आला तरी या प्रतिकाराला कोणत्याही प्रकारचें संघटित व सांघिक स्वरूप नव्हतें. या प्रतिकाराच्या दिवसांत एका तरुण शेतकऱ्यानें आपण परमेश्वराचे प्रेषित आहों असें जाहीर करून मुक्तेचा हा कायदा बनावट आहे, शेतकऱ्यांना फसविण्याकरितां हा कायदा करण्यांत आला, असेंही तो सांगत सुटला. यामुळें या चळवळीला कांहीं ठिकाणीं गंभीर स्वरूप प्राप्त झालें. या प्रेषिताच्या अनुयायांवर अर्थातच गोळीबार करण्यांत आले व त्यांत ५१ शेतकरी ठार झाले व ७७ शेतकऱ्यांना लहानमोठ्या जखमा झाल्या.

पण हा दंगा लवकरच शमला. ठिकठिकाणीं शांतताकमिट्या स्थापन करण्यांत आल्या. हा कायदा लोकांना समजावून देण्याची व्यवस्था करण्यांत आली व शेतकऱ्यांचीं नवीन स्थानिक स्वराज्यें खेड्यांतून प्रस्थापिण्याचे प्रयत्न करण्यांत आले. हा कायदा पास झाल्यानंतर जुनीं मोडकळीस आलेलीं ग्रामपंचातींचीं स्थानिक स्वराज्यें पुन्हां सांवरलीं. पूर्वीच्या काळीं असलेलें त्यांचें महत्त्व त्यांना पुन्हां प्राप्त झालें. या कायद्यामुळें मालकवर्गाच्या लोकांना पंचायतीच्या कारभारांत ढवळाढवळ करणें अशक्य होऊन बसलें व त्यांचे या बाबतींतलि बरेचसे हक्क काढूनहीं घेण्यांत आले. यामुळेंही पंचायतीचें वजन पुन्हां प्रस्थापित होण्यास मदतच झाली. रशियाचा शेतकरी अतिशय आळशी आहे अशी मालक वर्गाची नेहमीं तक्रार होती पण जमिनीवर राबण्याकरितां

आयते गुलाम मिळाल्यामुळें रशियाचा जमिनदारही अत्यंत आळशी बनला होता. शेतीचें उत्पन्न कसें वाढेल, शेतकीच्या बाबतींत कोणकोणत्या सुधारणा झाल्या आहेत, याचा त्यांना पत्ताही नसे. देशांतील पत्रकर्त्यांनीं जमिनदारांच्या या वर्तनाबद्दल त्यांच्यावर सडकून टीका केल्या व गुलाम म्हणून शेतावर काम करणाऱ्या कुळांपेक्षां स्वतंत्र शेतकरी कसें काम करतात व त्या-पासून मालक वर्गाचा कसा फायदा होतो, हें त्यांनीं मालक-वर्गालाही पटवून दिलें.

कुलकांचा उदय

१८६१ सालीं झारच्या सरकारनें गुलामगिरीवजा असलेली कुळपद्धति कायद्यानें बंद केली. रशियांतील शेतकरीवर्गाला यामुळें समाधान वाटलें. देशांतील सुशिक्षित वर्गानेंही त्या वेळच्या झारच्या या कृत्याची प्रशंसाच केली. स्वतंत्र शेतकरी किंवा स्वतंत्र मजूर गुलामगिरींत जखडलेल्या मजुरापेक्षां अधिक काम करतो, तो अधिक उत्पादनक्षम असतो, हा सिद्धांत त्यावेळचे युरोपांतील वैज्ञानिक पुष्कळ वर्षांपासून प्रतिपादीत होते. युरोपा-तील पाश्चात्य राष्ट्रांत हा सिद्धांत प्रत्यक्ष अनुभवानें खरा ठरला होता. जर्मनींतील निकस जमिनी आतां चांगल्या सुपीक बनल्या होत्या. फ्रान्स व हॉलंड देशांतही असाच अनुभव आला होता. रशियांतील काळ्या पिकाऊ जमिनीपेक्षांही वरील देशांतील जमिनी अधिक सुपीक बनल्या होत्या. इंग्लंडमधील जमिनदार आपल्या जमिनींतून खूप माल काढीत होते व त्यावर हवा तितका नफाही मिळवीत होते. जमिनीची उत्पादनशक्ति वाढल्या-

मुळें या देशांतील धान्याचें उत्पन्न वाढलें होतें. कच्च्या मालाची मोठ्या प्रमाणावर पैदास होऊं लागल्यामुळें तेथील उद्योगधंदेही भरभराटीला येऊं लागले होते. पण रशियांतील जमिनदारांना ही गोष्ट अद्याप पटलेली नव्हती. रशियाचा शेतकरी भयंकर आळशी आहे, त्याला मोकळें सोडलें तर अगदीं उपासमारीपासून आपलें जेमतेम रक्षण होईल इतकेंच तो पिकवील, अशी या जमिनदारांची कल्पना होती. बरें हे जमिनींचे मालक तरी मोठे व्यवहारज्ञ व शहाणे होते असें नाहीं. धंद्याला लागणारें व्यवहारचातुर्य यांच्यापाशीं नव्हतें त्याचप्रमाणें सुधारलेलीं शेतीचीं आउतें व यंत्रसामुग्री विकत घेण्याइतकें रोख भांडवलही त्यांच्यापाशीं नव्हतें. रशियाच्या दक्षिणभागांतील शेतीची जमीन अत्यंत सुपीक होती. तिच्यांतील मूळचा सुपीकपणा अद्याप कायम होता. या जमिनीची योग्य लागवड करण्यांत आल्यास रशियाच्या त्या भागांतील रहिवाशांना पुरून उरेल इतकें धान्य पिकविण्यास ही काळी माई समर्थ होती. अशा परिस्थितींत जमिनदारांनीं स्वतः होऊनच कुळपद्धति नाहींशी करून शेतकऱ्यांना मुक्त करण्याच्या कामीं पुढाकार घ्यावयास पाहिजे होता. पण ती गोष्ट ते करूं शकले नाहींत. या बाबतींत खुद्द सरकारलाच हात घालावा लागला व जमिनदारांच्या तोंडांत हा सुधारणेचा घास कोंबावा लागला. शेतकऱ्यांना आळशी म्हणणारे जमिनदार स्वतः कोठें आळशी नव्हते ? आपल्या जमिनी किती, त्यांत काय पिकतें, पीक काढण्याकरितां खर्च काय येतो व शेवटीं शिल्लक काय राहते याची जमिनदारांना दादही नसे. पण कुळांची मुक्तता झाल्याबरोबर मात्र हे जमिनदार जागे झाले, पूर्वीसारखा गाफिलपणा करून यापुढें चालावयाचें नाहीं असें त्यांना वाटूं लागलें.

कुळांच्या मुक्ततेपूर्वी एकही जमिनदार साधा जमाखर्च देखील ठेवीत नव्हता, त्याला आतां जमाखर्च ठेवावाच लागला व आपला व्यवहार कसा काय चालला आहे हें पहावेंच लागलें.

या क्रांतीमुळें रशियाच्या उत्तर भागांतील जमिनदारांचें मात्र नुकसान झालें. आपल्या जमिनी त्यांना सोडून द्याव्या लागल्या. शेतकरी स्वतंत्र झाले, कुळपद्धति नष्ट झाली, यानंतर शेतीचा धंदा करणें आंतबट्ट्याचें आहे असें त्यांना आढळून आलें. त्यांनीं आपल्या ताब्यांतल्या मोठमोठ्या जमिनी सोडल्या व जमिनींच्या लहान लहान तुकड्यांवर खर्चाला व जमेला मेळ बसेल या रीतीनें शेती करण्यांस त्यांनीं सुरवात केली.

कुळपद्धति नाहींशी करून शेतकऱ्यांना गुलामगिरींतून मुक्त केल्यानें शेतीच्या धंद्याची सुधारणा होईल, पडीत जमिनी लागवडीला येतील, शेतीच्या जनावरांची संख्या वाढेल, शेतीचें उत्पन्न वाढेल, गुलामगिरीमुळें शेतकरी वर्गांत जीं व्यसनें फैलावलीं होतीं तीं नाहींशीं होतील, नवीन ग्रामसंस्था निर्माण होतील, शेतकऱ्यांचें जीवन आरोग्यमय व सुखमय होईल, अशा अपेक्षा करण्यांत आल्या होत्या पण त्या सर्व चुकीच्या ठरल्या. शेतकरी स्वतंत्र झाला तेव्हां तो उद्योगी होईल, निर्व्यसनी बनेल, नैतिक दृष्ट्या या वर्गाची उन्नति होईल असें देशांतील पुष्कळ शहाण्या लोकांना वाटलें होतें, पण तें फोल ठरलें. मनुष्याला गुलामगिरींत डांबून ठेवून त्याच्याकडून काम करून घेणें ही गोष्ट नैतिक दृष्ट्या योग्य नाहीं, माणुसकीला ती काळिमा लावणारी आहे, ही गोष्ट खरी पण शेतकऱ्यांची गुलामगिरी नष्ट करण्यांत आली ती केवळ नैतिक तत्त्वांचा विजय व्हावा म्हणून करण्यांत आली नव्हती. शेतकरी स्वतंत्र झाल्यानें शेतीचा धंदा सुधारेल व देशाच्या

उत्पन्नांत भर पडेल, उद्योगधंदे वाढतील व देशांतील दारिद्र्य व दैन्य कमी होईल अशा अपेक्षेनें ही गुलामगिरी नष्ट करण्यांत आली होती. ही गुलामगिरी नष्ट झाल्यानें नैतिक तत्त्वाचा विजय झाला पण प्रत्यक्ष व्यवहारदृष्ट्या या क्रांतीचा कांहीं फायदा झाला नाहीं. ही पद्धति नष्ट होऊन दहा वर्षे होऊन गेलीं पण तिचा प्रत्यक्ष फायदा मात्र अनुभवास आला नाहीं. शेतकरी स्वतंत्र झाले. ते पूर्वीपेक्षां जास्त दारू पिऊं लागले व कमी काम करूं लागले.

शेतकरी स्वतंत्र झाल्याबरोबर पूर्वीप्रमाणें ग्रामपंचायतीच्या कामाला उत्तेजन मिळालें. या ग्रामसंस्थेचें वजनही वाढलें पण त्याचबरोबर या संस्थेचे सभासद नैतिक दृष्ट्या भ्रष्ट होत चालले. हे लोक लाचलुचपत घेऊं लागले व व्होडका दारूचे ग्लास झोकून आपले निकाल देऊं लागले. कुळपद्धति अस्तित्वांत असतांना मालकाचें धान्य आपल्या गाडींतून वहावें, मालकाच्या कुटुंबाला लागणारें सरपण तोडावें व तें त्याच्याकडे पोंचवावें, अंडीं, कोंबडीचीं पिलें, घरीं तयार केलेलें तागाचें कापड त्याला नेऊन द्यावें, असलीं कामें शेतकरी कुळें आपण होऊन करीत असत व त्याबद्दल त्यांना थोड्याफार सवलतीही मिळत असत. जमिनीच्या बांधावर वर्षांतून कांहीं दिवस त्यांच्या गुरांना चारण्यास मिळत असे, मालक त्यांना कधीं कधीं गाई व घोडेही देत असे. आणि दुष्काळाच्या दिवसांत तर त्यांचा सर्व आधार मालकांवरच असे. आतां ही सर्व परिस्थिति बदलून गेली. स्वतंत्र झालेल्या शेतकऱ्यांना आतां फुकट असें कांहींच मिळेनासें झालें. धान्य लागलें, गुरांना चारा लागला, बीं बियाणें पाहिजे असलें, खताची गरज लागली तर या सर्व वस्तूंकरितां त्याला आतां पैसे मोजावे लागले

व या गरजा पुरविण्याकरितां अर्थातच तो सावकारांचे उंबरठे झिजवूं लागला. रशियाचा शेतकरी स्वतंत्र झाला. त्याला मोकळेपणानें सर्व व्यवहार करतां येऊं लागले हा त्याचा फायदा झाला. पण स्वतंत्र झाल्याबरोबर शेतीकरितां लागणारें भांडवल त्याला थोडेंच पुरविणार होतें? सरकारनें कायदा करून शेतकऱ्याची गुलामगिरी नाहींशी केली पण हा स्वतंत्र झालेला शेतकरी आपला धंदा कसा करील, धंद्याकरितां लागणारें भांडवल कोठून आणील, पंचायतीच्या जमिनीचा कांहीं हिस्सा त्याला मिळेल पण हा जमिनीचा तुकडा त्याला पुरेसा मिळेल कां नाहीं, यांचा विचार सरकारनें केला नाहीं. पूर्वींचे जमिनदार आतां जवळजवळ भांडवलवालेच बनले, कमींत कमी मजुरी द्यावयाची व जास्तींत जास्त काम करून घ्यावयाचें या तत्त्वावर ते शेतकऱ्यांकडून शेतीचीं कामें करून घेऊं लागले. पंचायतीमार्फत ज्या जमिनी शेतकऱ्यांना मिळत त्या त्यांच्याकडे कायमच्या राहत नसत. गांवाखालच्या पंचायतींच्या जमिनींची दरसाल नवीन वांटणी होत असे. त्यामुळें या वर्षीं पिकविलेली जमीन आपल्याकडे पुढील वर्षीं राहीलच असा भरंवसा नसल्यामुळें त्या जमिनींचा कस सुधारण्याकडे शेतकरी लक्ष देतो कशाला? आपल्या वांटणीला आलेली जमीन कशी तरी नांगरावयाची, पेरावयाची व तिच्यांतून पीक काढून घ्यावयाचें एवढेंच तो पहात असे. जमिनीबद्दल त्याला आपलेपणा वाटत नसे व त्यामुळें जमिनींचा कस सुधारण्याकडे कोणीही लक्ष देत नसे. या गोष्टीचा व्हावयाचा तोच परिणाम झाला. दिवसेंदिवस जमिनींचा कस कमी होत चालला. शेतकऱ्यांचें पोट भरेनासें झालें, तो कर्जबाजारी होत चालला. असल्या परिस्थितींत कांहीं निरलस, निर्व्यसनी, उद्योगी शेत-

कऱ्यांनीं या धंद्यांत थोडी सुधारणा केली. पण 'दर्यामें खसखस' इतक्या प्रमाणांतच ही सुधारणा घडून आली. अपेक्षेप्रमाणें या धंद्यांत मुळींसुद्धां सुधारणा झाली नाहीं.

शेतकरी कुळांना मुक्त केल्याबरोबर व ते शेतीच्या धंद्यांत स्वतंत्र रीतीनें पडल्याबरोबर त्याला जरूर तें भांडवल मिळेल व शेतीच्या धंद्याला लागणारें योग्य तें शिक्षणही त्याला मिळेल अशी व्यवस्था सरकारनें केली असती व त्याचबरोबर शेतकऱ्याला सावकाराकडे जावें लागणार नाहीं अशीही तरतूद सरकारनें केली असती तर या स्वतंत्र शेतकऱ्यानें शेतीच्या धंद्याला थोडी तरी बरकत आणून दाखविली असती. पाद्री काय किंवा शिक्षक काय शेतकऱ्याच्या स्वभावांत तो बदल करूं शकत नाहीं. या शिक्षणाचा प्रथमदर्शनीं अगदीं उलटच परिणाम होतो. एकाद्या खेड्यांत एकदोन शेतकरी साक्षर झाले, त्यांना लिहितां वाचतां येऊं लागलें कीं ते त्या गांवांत दुष्टाचार्य बनतात. आपल्या शिक्षणाचा व बुद्धीचा ते दुरुपयोग करतात. आपल्या शेजाऱ्याच्या अज्ञानाचा फायदा घेतात व त्याला लुबाडतात. गांवांत जो सर्वांत शहाणा तो सर्वांत बदमाष बनतो व 'मीर'मध्यें तो दुसऱ्या कोणाचें कांहीं चालूं देत नाहीं असल्या शिक्षणविषयक सुधारणा करावयाच्या असल्यास त्या सार्वत्रिकच कराव्या लागतात व तसें झालें म्हणजे गांवांतील अनैतिक प्रकारांना व लांडीलबाडीला आळा बसतो. केवळ नैतिक सुधारणा घडवून आणून मनुष्यांचें भौतिक कल्याण करू पाहण्याचा मार्ग अगदीं खात्रीलायक, असा कांहीं लोकांचा समज असतो. पण तो द्राविडी प्राणायामासारखा आहे. आपली उन्नति करून घ्यावयाची असल्यास ती सांघिक रीतीनें कशी करून घ्यावी हेंच त्याला शिकविलें पाहिजे, आणि

शेतकऱ्यांच्या बाबतींत तर पंचायत संस्था, पंचायत कारभार, शेतकऱ्यांचें स्वराज्य या सामुदायिक पद्धतीनें व प्रयत्नानेंच त्यांचे हितसंबंध रक्षण करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

कुळांना मुक्त करण्याचा कायदा करतांना वरील सर्व गोष्टींचा सरकारनें विचार करावयास पाहिजे होता. पण तसें झालें नाहीं. त्यामुळें हे सर्व शेतकरी सावकारांच्या व पुढें प्रसिद्धीस आलेल्या 'कुलक' नांवाच्या श्रीमंत शेतकऱ्यांच्या भक्ष्यस्थानीं पडले. कुळें मुक्त झालीं, शेतकरी स्वतंत्र झाला, तेव्हां अर्थातच ग्रामपंचायतीचा कारभार सुधारावयास पाहिजे होता. पण परिणाम उलटच झाला. कुळपद्धति अस्तित्वांत असतांना ग्रामपंचायतीचें शेतकऱ्यांवर वजन होतें तें आतां नाहींसें झालें. ही पद्धति अस्तित्वांत होती त्या वेळीं मीरमधील सभासदही थोडे होते. गांवांतील कुटुंबें त्या वेळीं मोठीं होतीं व या प्रत्येक कुटुंबांतील वडील माणूस मीरमध्यें यावयाचा अशी पद्धति असल्यामुळें मीरच्या सभासदांची संख्याही कमी होती. अर्थात् या मीरमधील कोणी सभासद अप्रामाणिकपणानें वागूं लागले व नियमबाह्य वर्तन करूं लागले तर त्यांच्यावर कडक निर्बंध घालणें त्यावेळीं शक्य होतें. कुळें स्वतंत्र झाल्यावर पुर्वीची मोठीं कुटुंबें नष्ट झालीं व या लहान लहान कुटुंबांतील तरुण कर्ता माणूस सहाजिकच मीरमध्यें येऊन बसूं लागला. अशिक्षित, उनाड तरुण पोरांची संख्या मीरमध्यें वाढली. मीरच्या कारभारांत गोंधळ होऊं लागला. कोणत्याही प्रश्नाचा निर्णय करावयाचा झाला कीं, आरडाओरडा करून बहुमत करण्यांत येऊं लागलें व पूर्वी सांगितल्याप्रमाणें मीरच्या सभासदांना व्होडका पाजूनही त्यांच्याकडून आपल्यासारखे निर्णय करून घेण्यांत येऊं लागले. जुने दिवसच बरे होते.

आतां सर्व गोंधळ माजला आहे. तरुण मंडळी आतां बिघडून गेलीं आहेत. मालकांच्या ताब्यांत आपण होतों, तेंच फार चांगलें होतें. असें कांहीं म्हातारे लोक या वेळीं उद्गार काढूं लागले.

म्हाताऱ्या माणसांना नवें असें कांहीं नकोच असतें. ते त्याला नेहमीच नांवें ठेवीत असतात. कुळपद्धति रद्द करण्यांत आली, शेकतरी स्वतंत्र झाला म्हणून हा गोंधळ माजला या म्हणण्यांत कांहीं अर्थ नव्हता. ही पद्धति नष्ट केल्याबरोबर पंचायतीच्या कारभाराच्या बाबतींतही चालू परिस्थितीला अनुसरून ज्या सुधारणा करावयास पाहिजे होत्या त्या करण्यांत आल्या नाहींत. म्हणूनच पंचायतींचें पूर्वीचें वजन नष्ट होत चाललें. रशियांत सर्वत्र मीरपद्धति अस्तित्वांत होती पण या मीरचा कारभार कांहीं ठिकाणीं अत्यंत कडक शिस्तीनें तर कांहीं ठिकाणीं अगदीं भोंगळपणानें चालत असे. सरंजामदारी पद्धति सुरू होण्यापूर्वी जे मीर अस्तित्वांत होते तशाच प्रकारच्या मीर संस्था एकोणिसाव्या शतकच्या उत्तरार्धांत चालवूं म्हटलें तर तें शक्य नव्हतें. या शतकांत सुरू झालेल्या सुधारणांना व औद्योगिक क्रांतीला अनुलक्षून या संस्थांच्या कारभारांत दुरुस्त्या व्हावयास पाहिजे होत्या त्या तशा झाल्या नाहींत. म्हणून शेतकऱ्यांना मिळालेल्या स्वातंत्र्याच्या नांवानें खडे फोडण्यांत कांहीं अर्थ नव्हता. मीर पद्धतीमध्यें या कालाला योग्य अशा सुधारणा केल्या गेल्या नाहींत यामुळें त्यांचें वजन कमी होत चाललें व पुष्कळ ठिकाणीं तर या संस्था त्या वेळच्या प्रबल होत चाललेल्या कुलकांच्या हातीं गेल्या व गरीब शेतकऱ्यांना लुबाडण्याच्या कामीं या संस्थांचा ते उपयोग करूं लागले.

कुळपद्धति नष्ट झाली. रशियाचा शेतकरी स्वतंत्र झाला. सरकारी कायद्यानें त्याचें स्वातंत्र्य जाहीर केलें, पण भोंवतालच्या परिस्थितीनें त्याला पुन्हां परतंत्र बनविलें. शेतकऱ्याचें स्वातंत्र्य या परिस्थितीनें हिरावून घेतलें नाहीं. शेतकऱ्याच्या देहावर शेतकऱ्याचीच मालकी राहिली. शेतकऱ्याच्या देहावरील जमिनदाराची किंवा सरदाराची सत्ता आतां नष्ट झाली. शेतकरी स्वतंत्र झाला पण तो कसा स्वतंत्र झाला? त्याला स्वातंत्र्य मिळालें असलें तरी त्याला त्याचा पूर्णांशानें उपभोग घेतां आला नाहीं. आपला देह विकण्याचें स्वतंत्र्य मात्र त्याला पूर्णपणें प्राप्त झालें. औद्योगिक क्रांतीनंतर कामगारांची जी स्थिति झाली तोच प्रसंग या स्वतंत्र झालेल्या शेतकऱ्यावरही ओढवला. शेतकरी कुळें झाल्यावर गांवच्या पंचायतीच्या ताब्यांतल्या जमिनीपैंकीं किंवा ज्यांच्यावर पंचायतीचा हक्क नाहीं किंवा जमिनदारांचाही हक्क नाहीं अशा जमिनीपैकीं कांहीं हिस्सा अशा स्वतंत्र शेतकऱ्यांना मिळाला. पण या तुकड्यावर त्याचा उदरनिर्वाह होणें शक्य नव्हतें. कुळांना स्वतंत्र करण्याचा कायदा झाला. या कायद्यानें जमिनदारांच्या जमिनी मात्र काढून घेण्यांत आल्या नाहींत. कुळें स्वतंत्र झालीं पण त्यांना स्वतंत्र रीतीनें उदरनिर्वाह करतां येईल अशा जमिनी कोठें शिल्लक होत्या? ज्या थोड्या जमिनी त्यांना दिल्या त्या पुरेशा नव्हत्या हें मागें सांगितलेंच. तेव्हां पुन्हां जमिनदारांच्या दारीं जाऊन त्यांना काम मागण्याशिवाय या शेतकऱ्यांना गत्यंतरच नव्हतें. श्रमजीवि कामगार कारखानदारांचा गुलाम नसतोच पण मजुरीकरितां त्याला आपली श्रमशक्ति कारखानदाराला विकावी लागतेच. म्हणजे कारखान्यांत काम करीत असेपर्यंत आपला देह तो कारखानदाराला तात्पुरता विकीतच

असतो. स्वतंत्र झालेल्या या शेतकऱ्याचेंही असेंच झालें. बाहेर उपजीविकेचें साधन पुरेंसें न मिळाल्यानें त्याला त्याचें स्वातंत्र्य राहूनही जमिनदाराच्या स्वाधीन राहावें लागलें. शेतकरी प्रत्यक्ष जमिनदाराचा गुलाम झाला नाहीं तर तो मजूरीचा गुलाम बनला. आणि या घडामोडीच्या काळांत स्वतंत्र झालेल्या शेतकऱ्यांना लुबाडणारा आणखी एक वर्ग निर्माण झाला. हा वर्ग म्हणजे सावकार शेतकऱ्यांचा वर्ग होय. शेतकऱ्याला लुबाडणाऱ्या पूर्वीच्या जमिनदार वर्गांत या कुलक वर्गाची आणखी भर पडली. पूर्वीचे जमिनदार कांहीं निश्चित क्षेत्रावरच आपली मालकी सांगत असत पण कुलक वर्गाचा लोभ अनावर होता. अडचणींत सांपडलेल्या शेतकऱ्यांना कर्जे द्यावयाचीं, डोईजड झालेलीं कर्जे फिटनाशीं झालीं म्हणजे त्याच्या जमीनी मांडीखालीं घालावयाच्या व अशा रीतीनें एकामागून एक जमिनी घेत राहावयाचें; हाच या कुलकांचा धंदा होता. ज्याच्याजवळ जास्त जमीन त्याचा दर्जा अधिक, तोच अर्थात जास्त श्रीमंत. तेव्हां अशा जमिनी बळकावण्याची कुलकांची आपसांत चढाओढ लागल्यास त्यांत कांहींच नवल नव्हतें. जमिनदारांच्या जुन्या व नव्या गुलामगिरीच्या गुलामापेक्षां या कुलकांच्या गुलामगिरीचा व त्यांनीं चालविलेला पिळणुकीचा जुलूम शेतकऱ्यांना असह्य होत चालला होता.

या कुलक वर्गासंबंधानें लेनिननें पुढीलप्रमाणें आपले विचार प्रकट केलें आहेत. लेनिनचे हे विचार महायुद्धानंतरच्या कालांतले असले तरी कुलकांच्या स्वभावचित्राची कल्पना येण्याकरितां ते या ठिकाणीं दिले आहेत. "जनतेची पिळणूक करणाऱ्या लोकांपैकीं कुलक हे अत्यंत नीच क्रूर, निर्दय व अत्यंत रानटी स्वभावाचे आहेत. जमिनदार, झार, पाद्री व भांडवलवाले यांची

सत्ता व वर्चस्व जनतेवर पुनःपुन्हा प्रस्थापित करण्याचें काम या वर्गानें केलें आहे. जमिनदार व भांडवलवाले यांच्यापेक्षां हे लोक संख्येनें जास्त आहेत. तथापि एकंदर लोकसंख्येच्या मानानें अल्पसंख्यच आहेत. हे रक्त शोषण करणारे लोक जनतेच्या गरजेचा फायदा घेऊन महायुद्धाच्या वेळीं श्रीमंत बनले. भाकरीची व इतर जिनसांची किंमत वाढवून या लोकांनीं लाखों रुबल कमावले. युद्धामुळें धुळीस मिळालेल्या शेतकऱ्यांच्या व उपासमारीनें गांजलेल्या कामकऱ्यांच्या जीवावर हे कोळी गलेलठ्ठ बनले आहेत. राबणाऱ्या कामगारांच्या रक्ताचें या जळवांनीं शोषण केलें आहे व शहरांतील व कारखान्यांतील कामगारांची जितकी जितकी उपासमार झाली तितके अधिकाधिक हे कुलक श्रीमंत झाले आहेत. निजलेल्या मनुष्याचें रक्त पिणाऱ्या या भुतांनीं जमिनदारांच्या इस्टेटी गिळंकृत केल्या आहेत व अद्यापीही गिळंकृत करीत आहेत, आणि गरीब शेतकऱ्यांना तर त्यांनीं पुन्हां गुलामगिरीच्या अवस्थेला पोंचविलें आहे."

क्रिमियन व फ्रँको-जर्मन युद्धानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या खेड्याच्या तुरुंगांतून मुक्त करण्यांत आलें. जगांतील अनेक चमत्कार दाखविण्यांत आले, ज्ञानाच्या कांहीं कणांची त्याला प्राप्ति झाली. परंतु खेड्यांतील एकाकी कंटाळवाण्या जीवनाच्या ऐवजीं कारखान्यांतील व बराकींतील गुलामी आपल्या पदरीं आली हें पाहून शेतकऱ्यांचें मन आश्चर्यानें थक्क झालें. याच संक्रमणाच्या कालांत बोलशेविकांनीं जगप्रसिद्ध केलेला कुलक वर्ग प्रथम उदयास आला. झार, जमीनदार व लष्करी शिपाई यांच्यापेक्षांही आपल्या शेतकरी बंधूंना अधिक निर्दयपणानें पिळणारा असा हा लोभी श्रीमंत शेतकऱ्यांचा वर्ग होता. शेतकऱ्यांच्या

उद्धारांतूनच या वर्गाची निर्मिती झाली आणि हाच वर्ग पुढें अजाणतेपणानें व अनिच्छेनें दुसऱ्या एका यापेक्षांही मोठ्या उद्धाराच्या चळवळीस कारणीभूत झाला. कुलक म्हणजे गरीब शेतकऱ्यांची जमीन गिळंकृत करणारी मूर्तिमंत भूक होय.

क्रांति

रशियाचा शेतकरी स्वतंत्र झाला पण तो सुखी झाला नाहीं. पूर्वी तो मालकाकडे व जमीनदाराकडे प्रत्यक्ष गुलाम म्हणून राबत होता. आतां तो माणसाचा गुलाम राहिला नाहीं तर तो मजूरीचा गुलाम बनला, स्वतंत्र झाल्याबरोबर त्याला जो जमिनीचा तुकडा मिळाला त्याच्यावर त्याचें भागेनासें झालें. दुसऱ्याच्या जमिनीवर त्याला मजूर म्हणून राबावें लागले. आणि शेतांत कोठें काम मिळेनासें झाल्याबरोबर त्याला अर्थातच शहराचा मार्ग धरावा लागला. लष्करांत तो जाऊं लागला. खेड्यांत पोट भरेनासें झालें म्हणजे शहरांतील कारखान्यांत राबण्याकरितां जावें किंवा लष्करांत जावें हे दोनच मार्ग शेतकऱ्यांना मोकळे असतात. या मार्गांचा त्यानें साहजिकच अवलंब केला. खेडेगांवांतून पूर्वी मालकीची शेती करणारांचा मुख्यतः भरणा असे पण आतां ही परिस्थिति बदलली. खेडेगांवांतून आतां शेतकरीमजुरांची संख्या वाढूं लागली. कुळपद्धति अस्तित्वांत असतांना गुलाम शेतकरी-कुळें गांवांत व जमिनदारांच्या वस्तींत दिसत होतीं त्याऐवजीं आतां शेतकरी-मजूर सर्वत्र

दिसूं लागले. लिहितांवाचतां येत नाहीं, बाहेर काय चालू आहे हें माहीत नाहीं, शेतीच्या धंद्याचें पूर्ण ज्ञान नाहीं, सुधारलेल्या शेतीचा गंधही नाहीं. सुधारलेलीं आउतें वापरण्याची ताकद नाहीं, जवळ तितकें द्रव्यबल नाहीं, खतें विकत घेण्यास पैसा नाहीं व तीं कशीं केव्हां वापरावीं याचेंही ज्ञान नाहीं, यामुळें शेतीचें उत्पन्न घटत चाललें, शेतकरी दरिद्री होत चालला, अशा रीतीनें अडाणी राहिलेला व दरिद्री होत चाललेला शेतकरी व्यसनीही बनत चालला.

एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं व विसाव्या शतकाच्या प्रारंभीं जगांतील, विशेषतः युरोपांतील देशांतून मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदे चालू झाले होते. या उद्योगीकरणाची लाट रशियावरही आली होती. झारच्या एकतंत्री राज्यसत्तेमुळें या उद्योगधंद्याची वाढ रशियांत व्हावी तशी झाली नाहीं हें खरें तथापि या एकतंत्री राज्यसत्तेंतच ज्या सवलती मिळत असत त्यांचा फायदा घेऊन देशी व परदेशी मोठमोठे भांडवलवाले रशियांत मोठमोठे कारखाने स्थापीत होते. रशियांतील शहरें आतां वाढूं लागलीं होतीं. खेड्यांतील बेकार शेतकरी शहरांतील कारखान्यांत नोकरी पाहूं लागले होते. रशिया देश शेतकऱ्यांचा खरा पण औद्योगिक क्रांतीनंतर इतर देशांप्रमाणें रशियांतही एक नवीन मजूर वर्ग निर्माण होऊं लागला होता. अर्थात् खेडेगांवांतील शेतकऱ्यांना तेथील जमीनदार व कुलक (सावकार शेतकरी) वर्ग व शहरांतील मजूरांना भांडवलदार व कारखानदार वर्ग पिळूं लागला होता. भांडवलशाही पद्धतीचा हा स्वाभाविक परिणाम आहे. औद्योगिक क्रांतीनंतर या भांडवलशाही युगाला सुरुवात झाली व पिळणूक, दारिद्र्य, बेकारी उपासमार हा या

युगाचा युगधर्म असल्यामुळें रशिया देश या जगत्प्रवाहाच्या बाहेर राहूं शकला नाहीं. कुळपद्धति अस्तित्वांत असतांना माणुसकीला लाजविणाऱ्या गुलामगिरीच्या गांजणुकीला कंटाळून मालकांविरुद्ध रशियांतील शेतकऱ्यांनीं वेळोवेळीं बंडांचीं निशाणें उभारलीं होतीं. जमिनदारांचे खून, मारामाऱ्या, जाळपोळ, लुटालूट असले मार्गही या अन्यायाच्या प्रतिकारार्थ शेतकऱ्यांनीं योजले होते. पण अनुभवानें हे मार्ग सोयीचे नाहींत, असें आढळून आल्यावर निःशस्त्र प्रतिकाराचाही त्यांनीं अवलंब केला होता. देशांतील शेतीच्या धंद्याची भरभराट व औद्योगिक उन्नति व्हावयाची असल्यास शेतकरी स्वतंत्र झाला पाहिजे या तत्त्वाला अनुसरून झारनें कुळपद्धति नष्ट केली पण इतकें करूनही शेतकरी वर्गांत पसरलेला असंतोष व त्यांच्यांत वाढत चाललेली प्रतिकाराची प्रवृत्ति वाढत आहे हें पाहून त्यांच्या मनावर या गोष्टीचा कांहींच परिणाम होत नव्हता असें म्हणण्यांत अर्थ नाहीं. एकादें विशिष्ट तत्त्वज्ञान किंवा एकादी नीतिची कल्पना भौतिक आवश्यकतेंतून व परिस्थितींतून निर्माण होत असते. देशाचें उत्पन्न वाढावें व उद्योगधंदे भरभराटीस यावे या उद्देशापेक्षां राष्ट्रांतील सामान्य जनतेंत पसरलेला असंतोष प्रथम नाहींसा झाला पाहिजे या उद्देशानेंच झारच्या सरकारनें कुळपद्धति नष्ट करण्याचा चंग बांधला. सरदार व सरंजामदार विरुद्ध असले तरी झारनें त्यांच्या मतांना भीक घातली नाहीं. व कुळपद्धति नष्ट करून त्याबरोबर जनतेंत पसरलेला असंतोषही झारन गाडून टाकला पण ही परिस्थिति फार दिवस टिकून राहणें शक्यच नव्हतें. असंतोषाची आग एका बाजूनें विझविली गेली तर दुसऱ्या बाजूनें तिनें पेट घेतला. कुळपद्धतीची गुलामगिरी नष्ट झाली व शेतकऱ्यांच्या

नशीबीं मजूरीची गुलामगिरी आली. पहिल्या पद्धतींत शेतकऱ्यांची पिळणूक होत होती पण आपल्या ताब्यांतला गुलाम शेतकरी जिवंत राहिला पाहिजे व शेतांतले काबाडकष्ट करण्यास समर्थ राहिला पाहिजे हें मालकाला पाहावें लागत होतें. पण ही पद्धति नष्ट झाल्याबरोबर मालकावरची ही जबाबदारी नष्ट झाली. बाजारांतील अनेक जिनसाप्रमाणें शेतकऱ्यांची श्रमशक्तीही जमिनदारांना बाजारांत विकत मिळूं लागली. शेतावर काम मागण्याकरितां शेतकऱ्याला किमान मजुरी द्यावी व त्यांच्याकडून झोडपून काम करून घ्यावें. एक शेतकरी मजूर काम करण्यास असमर्थ झाला तर त्याची जागा भरून काढावयास हवे तेवढे बेकार शेतकरी मजूर तयार आहेतच. अशा परिस्थितींत जमिनदारानें दुसरी कसलीही काळजी न करतां शेतकरी मजुराचें रक्त जास्तींत जास्त कसें शोषतां येईल एवढीच काळजी त्यानें घेतल्यास त्यांत कांहींच आश्चर्य नव्हतें. कुळपद्धति नष्ट झाल्यानंतर शेतीच्या धंद्यांत अगदींच बरकत आली नाहीं असें म्हणतां यावयाचें नाहीं. हा धंदा पूर्वापेक्षां बराच सांवरला. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या युरोपीय देशांतील शेतीप्रमाणें रशियांतील शेती सुधारली नाहीं हें खरें पण पूर्वीचा आळस झाडून जागे झालेले जमिनदार इतर राष्ट्रांतील जमिनदाराशीं बरोबरी करण्याचा प्रयत्न करूं लागले. याप्रमाणें रशियांतील जमिनदार व सावकार एकीकडे सांवरत चालले तर तेथील शेतकरी अधिकाधिक दरिद्री बनत चालले. त्यांच्यांतील बेकारी व उपासमार वाढत चालली.

कुळांची मुक्तता करण्याचा कायदा झाल्यानंतर जमिनीची कमतरता पडल्यामुळें ज्या स्वतंत्र झालेल्या शेतकऱ्यांना जमिनदारांच्या शेतावर मजूर म्हणून राबावें लागलें त्यांची दिवसेंदिवस

खालावत चालली, त्याची उपासमार होऊं लागली पण जे शेतकरी अद्याप आपल्या मालकीची जमीन कसीत होते व आपल्या जमिनीच्या भरतीला जमिनदारांच्या जमिनी खंडानें करीत होते त्यांची स्थिति सुद्धां मोठीशीं स्पृहणीय होती असें नाहीं. कुळमुक्तेच्या कायद्यानंतर स्वतंत्र शेतकऱ्यांनीं जमिनदारांच्या शेतांवर मजूर म्हणून राबावें किंवा त्यांच्या जमिनी खंडानें तरी घ्याव्या अशी परिस्थिति सरदार वर्गानेंच निर्माण केली होती. स्वतंत्र झालेल्या शेतकऱ्यांना पिकाऊ अशी पुरेशी जमीन मिळाली नाहींच पण त्यापेक्षांही जंगलांतील कुरणें, गुरेंचराईचीं रानें, रस्ते वगैरे शेतकरी समाजाला अवश्य असलेल्या गोष्टींची उणीव उत्पन्न झाल्यामुळें या शेतकऱ्यांचें फारच हाल होऊं लागले. व्होरोनेझ प्रांतांतील शेतकऱ्यांच्या वाटा बंद करण्यांत आल्या, शेतकऱ्यांचा शेतांतील व गांवांतील माल जेथल्यातेथेंच पडून राहाण्याचा प्रसंग आला. शेतकऱ्यांचीं जनावरें भराभर कोंडवाड्यांत टाकण्यांत येऊं लागली, त्याबरोबर या प्रांतांतील शेतकऱ्यांनीं ठिकठिकाणीं दंगेही केले. टॅजिन्स नांवाच्या एका खेड्यांतील सर्व शेतकऱ्यांनीं तेथील जमिनदारांच्या वाड्यापुढें जाऊन कुरणें व गायरानें मोकळीं करून देण्याबद्दल गुडघे टेकून त्याची प्रार्थनाही केली. पोल्टावा प्रांतांत तर हा जुलूम परमावधीला पोंचला होता तेथील शेतकऱ्यांकडून प्रत्येक गाईच्या मागें गुरेंचराईची फी म्हणून १२ रुबल घेण्यांत येत होते. या जुलमांना कंटाळून या भागांतील शेतकऱ्यांनीही दंगे केले. कुळमुक्तेच्या कायद्यानंतर स्वतंत्र झालेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष जमिनी किती मिळाल्या व जमिनदारांजवळ किती जमिनी राहिल्या याची कल्पना पुढील आंकड्यांवरून येण्यासारखी आहे.

" ६१९००० लहान शेतकरी मालकांजवळ म्हणजे शेतकरी वर्गांतील शेंकडा ८२·२ शेतकऱ्यांपाशीं फक्त ६५००००० *देशियाटिन्स जमीन होती व २०००० जमिनदारांपाशीं म्हणजे शेंकडा ०·३० लोकांपाशीं ६२०००००० देशियाटिन म्हणजे प्रत्येकीं अंदाजें २२२७ देशियाटिन जमीन होती." रशियाच्या आर्थिक परिस्थितिसंबंधानें लिहिलेल्या पुस्तकांत लेनिननें वरील प्रकारचें पृथक्करण केलें आहे. राष्ट्रांतील पिकाऊ जमिनींची अशा रीतीनें विषम वांटणी झाली होती. चांगल्या पिकाऊ जमिनी शेतकऱ्यांना देण्यांत आल्या नाहींत. मुरमट, वाळू असलेल्या जमिनी त्यांना देण्यांत आल्या. असल्या निकस जमिनीवर शेतकऱ्यांना रावावें लागलें, या जमिनींतून चांगलें पीक येईनासें झालें. गुरेंचराईच्या रानांच्या अभावामुळें शेतीच्या जनावरांचा तुटवडा पडला. शेतीला लागणारें खत शेतकऱ्यांना मिळेनासें झालें, खताच्या अभावीं पीकही चांगलें येईनासें झालें, पिकाच्या अभावीं खुद्द शेतकऱ्यांचीही उपासमार होऊं लागली. ओरेल, टूला, पेंझा, व्होरोनेझ, कुर्स्क, तांबो वगैरे प्रांत असलेला काळ्या जमिनीचा रशियांतील दक्षिण भाग अत्यंत सुपीक आहे. कुळमुक्ततेच्या कायद्यानंतर या भागांतील जमिनींच्या किंमती व खंडाचें प्रमाण पुढीलप्रमाणें वाढलें. ज्या जमिनींची किंमत १८८८ सालीं शें. १०० रुबल होती तिची किंमत १९०४ सालीं शें. २०४ नें वाढली व १८८८ सालीं दर ×हेक्टराला १५, रुबल खंड मिळत होता त्याचें प्रमाण १९०४ सालीं दर हेक्टरास २०७ रुबल अशा प्रमाणांत वाढलें. अशा रीतीनें सर्वतोपरी

*१ देशियाटिन = २·८ एकर. ×१ हेक्टर = १·७ एकर.

गांजलेला रशियाचा शेतकरी जमिनदाराविरुद्ध व कुलकांविरुद्ध उठला व क्रांतीला प्रवृत्त झाला तर त्यांत कांहीं नवल नव्हतें. रशियांतील खुद्द जमिनदारांना व कुलकांनाच या परिस्थितीची जाणीव झाली होती. " तुम्ही आम्हांला इतकी थोडी जमीन दिली आहे कीं तीवर आम्ही मुलींसुद्धां पोट भरूं शकत नाहीं. बंदरावर नांगरून टाकलेल्या बोटींतच जणूं काय तुम्ही आम्हांला जखडून बांधून ठेवलें आहे. तेव्हां हे पाश तोडून टाकण्याची वेळ आतां आली आहे. " असे वैतागाचे उद्गार रशियांतील शेतकरी यावेळीं काढूं लागले होते. १९०१ सालीं एका जमिनदारानें आपल्या मित्राला लिहिलेल्या एका पत्रांत पुढील विचार प्रदर्शित केले होतेः—

" अत्यंत अशुभसूचक चिन्हांनीं सर्व वातावरण धुंद होऊन गेलें आहे, सर्व क्षितिज आगीच्या डोंबाळ्यानें भरून गेलें आहे, असें आम्हांला दिसत आहे. सर्व जमीन रक्तरंजित झाली आहे, वादळापूर्वीच्या वातावरणांत मनुष्याचा जीव कासावीस होतो, तशीच कठिण परिस्थिति आज निर्माण झाली आहे. रशियांतील मौझिक (सामान्य शेतकरी) आज उदासीन व स्तब्ध आहे असें दिसत आहे. हा शेतकरी अशा रीतीनें तोंड उघडील कीं, त्याच्यापुढें आमची धडगत राहणार नाहीं. "

याच सुमारास म्हणजे १९०९ च्या प्रारंभीं १७ फेब्रुवारी रोजीं कुळमुक्ततेच्या कायद्याचा ४० वा वाढदिवस खारकोव येथील विद्यार्थ्यांनीं व कामगारांनीं साजरा केला. हा समारंभ अर्थात्च निर्विघ्नपणें पार पडला नाहीं. या समारंभानिमित्त निघालेल्या मिरवणुकीवर कोसॅकांनीं हल्ला चढविला पण मिरवणुकींतील विद्यार्थ्यांनीं व कामकऱ्यांनीं त्यांना दाद दिली नाहीं.

उलट या कोसॅक घोडेस्वारांवरच त्यांनीं हल्ला चढविला व त्यांना पिटाळून लावलें व आपल्या संरक्षणाकरितां शहरांतील रस्त्यावर त्यांनीं ठिकठिकाणीं तटबंदी केली. मास्को येथें १९०५ सालीं झालेल्या तटबंदीचा हा जणूं काय अरुणोदयच असें म्हणावयास हरकत नाहीं कुळमुक्ततेच्या कायद्यानंतर संतुष्ट होण्याऐवजीं असंतुष्ट झालेल्या शेतकरी समाजांत दरसाल कोठेंना कोठें तरी दंगे होत असत. हे दंगे अर्थात् तुरळक स्वरूपाचे होते. त्यांना जनतेंतील एकजुटीच्या दंग्याचें स्वरूप अद्याप प्राप्त झालेलें नव्हतें. परंतु विसाव्या शतकाच्या प्रारंभींच्या वर्षांत या दंग्यांना बरेंच उग्र व भीषण स्वरूप प्राप्त झालें. १९०५-१९०६ सालीं रशियांत पहिला शेतकरी-कामकरी क्रांतीचा लढा झाला. या लढ्यापूर्वीं शेतकरी समाजांतील असंतोषाला व दंग्याला कसें संघटित स्वरूप प्राप्त होत चाललें होतें त्याची कल्पना पुढील आंकडयावरून येण्यासारखी आहे. शेतकऱ्यांचे हे दंगे रशियांतील काळ्या सुपीक जमिनीच्या दक्षिण भागांत व त्याचप्रमाणें बिन काळ्या जमिनीच्या उत्तर भागांतही झाले. साधारण पिकांच्या जमिनीच्या उत्तरभागापेक्षां दक्षिण भागांतच विशेष दंगे झाले हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. १९०० ते १९०४ अखेर काळ्या जमिनीच्या भागांत एकंदर ५७१ दंगे झाले. यांपैकीं १९०२ सालीं या दंग्यांना जणूं काय ऊतच आला होता. या सालीं या भागांत ३०१ दंगे झाले. उत्तर भागांत या पांच वर्षांत ८९ दंगे झाले. या कालांत कांहीं प्रांतांतलि शेतकऱ्यांपैकीं शें. ८० शेतकरी या दंग्यांतून सामील झाले होते. पोल्टावा व खारकाव या दीड लाख वस्तीच्या लहान प्रांतांतलि तर जवळजवळ प्रत्येक शेतकरी या दंग्यांतून सामील झाला होता. या दंगेखोरांनीं पोल्टावा येथील ५४ व खारकोव

येथील २८ जमिनदारांच्या इस्टेटी धुळीस मिळविल्या. "पोल्टावा प्रांतांत शेतकऱ्यांनीं जीं अनेक अत्याचाराचीं कृत्यें केलीं व लूटमार केली त्यांना सरकारी अधिकारी आळा घालूं शकले नाहींत. मनसोक्त लूट मिळवून हे लुटारू स्वतः होऊनच आपापल्या गांवीं निघून गेले व हे दंगे शांत झाले." असें खारकोवच्या सरकारी प्रॉसीक्यूटरनेंच खुद्द कबूल केलें. हे दंगे शांत झाल्यानंतर मामुली रिवाजाप्रमाणें दंग्यांत सामील झाल्याच्या आरोपावरून कांहीं शेतकऱ्यांवर खटले भरण्यांत आले. या प्रसंगीं एका बंडखोर खेड्याच्या पाटलानें दिलेली साक्ष मननीय आहे. "आमचें जीवन हल्लींपेक्षां थोडें अधिक सुखमय असतें तर कोणतींही पुस्तकें आमच्यावर कांहींच परिणाम करूं शकलीं नसतीं. मग पुस्तकांतून कसलाही मजकूर लिहिलेला असो. पुस्तकें हीं खरोखरच भयंकर नाहींत. आमच्याजवळ खायला कांहीं नाहीं. आमच्याजवळ जमीन नाहीं, आमच्याजवळ धान्य नाहीं, गुरांना घालण्याकरितां आमच्याजवळ चारा नाहीं व त्यांच्याकरितां गुरेंचराईचीं रानेंही मोकळीं नाहींत. आमच्याजवळचीं शेतीचीं जनावरें झपाट्यानें कमी होत आहेत. मेंढ्या तर आमच्यापाशीं मुळींच नाहींत. शेतीचीं सुधारलेलीं आउतें आम्हीं घेऊं शकत नाहीं. जनावरांच्या शेणाचा आम्ही खत म्हणून उपयोग करूं शकत नाहीं. जळणाकरितां त्याचा आम्हांला उपयोग करावा लागतो. दरसाल आम्हाला धान्य कमी पडतें. आम्हांला उपासपोटीं निजावें लागतें. आमच्याजवळचा धान्याचा सांठा आम्हाला फार तर डिसेंबरपर्यंत पुरतो."

या पाटलाच्या वरील साक्षींतील शब्दन् शब्द खरा होता. रशियांतील कांहीं भागांतील शेतकऱ्यांच्या वांटणीला तर एक-चतुर्थांश हेक्टरच आला होता. एवढ्या शेतावर शेतकऱ्यांचें पोट

कसें भागणार? पावलोव भागांतील शेतकरी मजुरांची स्थिति यापेक्षांही अनुकंपनीय होती. या मजुरांना दररोज १५ कोपेक* मजुरी मिळत असे. या भागांतील शेतकरी मजुरांत बेकारीचें प्रमाण फारच वाढलें होतें व हे मजूर ५ कोपेक वेतनावर देखील दिवसभर राबावयास तयार होत असत. या भागांतील खेडूत उपासमारीनें गांजले होते आणि नेहमींच पोटभर खावयास न मिळाल्यामुळें या गांवांतून रातांधळेपणाच्या रोगाची सांथ उद्भवली होती. अशा रीतीनें ज्या भागांत भयंकर दारिद्र्य पसरलें आहे व तेथील शेतकरी मजुरांची निर्लज्जपणानें भयंकर पिळणूक चालू आहे त्या भागांत पुन्हां दुष्काळ पडला म्हणजे या लोकांचे हाल कुत्राही खात नसे. अशा या सर्वतोपरी गांजलेल्या प्रदेशांतच प्रथम शेतकऱ्यांच्या दंग्यांना प्रारंभ होत असे. इकडील भुकेनें व्याकूळ झालेले शेतकरी मोठ्या जमावानें जमिनदाराकडे धान्य मागण्याकरतां जात असत. फारच थोडे जमिनदार शेतकऱ्यांची ही मागणी मान्य करीत असत. आपली मागणी मान्य होत नाहीं असें आढळून आलें कीं हे शेतकरी जमिनदारांच्या कोठारांतून जबरदस्तीनें धान्य व बटाटे लुटून नेत. ज्या ठिकाणचे शेतकरी संघटित असत ते लोक अशा प्रसंगीं कोणत्याही प्रकारचा अत्याचार न करतां जमिनदारांच्या कोठारांतून धान्य व चारा तेवढाच लुटून नेत असत.

वरील सर्व वर्णनावरून रशियांतील शेतकऱ्यांची ही चळवळ केवळ भूक शमविण्यासाठींच चालली होती असें समजण्यांत अर्थ नाहीं. रशियांतील सोशल डेमोक्रॅट, सोशॅलिस्ट रेव्होल्यूशरी व

---

*१०० कोपेक = १ रूबल = अंदाजें १ रु. ७ आणे.

युक्रेनियन नॅशनॅलिस्ट पक्षांचे लहानलहान गट यावेळीं रशियांतील दुष्काळग्रस्त व पिळणुकीनें गांजलेल्या शेतकरी समाजांत वावरत होते व त्यांच्यावर ओढवलेल्या आपत्तींच्या मूळ कारणांची जाणीव ते त्यांना करून देत होते. १९०० नंतर रशियांत सर्वत्र मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे दंगे सुरू होण्यापूर्वी किती तरी या गटांतील सुशिक्षित तरुण खेड्यापाड्यांतून फिरत होते. परदेशांतून शिक्षण घेऊन आलेल्या कित्येक तरुणीही यांच्या गटांत होत्या. शेतकरी वर्गांत जागृति करायची म्हणजे त्यांच्यांत पूर्णपणें मिसळून गेलें पाहिजे ही गोष्ट ते जाणून होते. म्हणूनच यापैकीं पुष्कळ तरुण खेड्यापाड्यांतून राहून प्रत्यक्ष शेती करूं लागले होते व या गटांतील बऱ्याचशा तरुणींनी तरुण शेतकऱ्यांशीं लग्नें लावून त्यांच्या कुटुंबांत त्या एकरूप झाल्या होत्या. शेतकऱ्यांचीं रोजचीं गाऱ्हाणीं चव्हाट्यावर मांडावयाचीं, ती दूर करून घेण्यासंबंधानें प्रयत्न करावयाचा, शेतकऱ्यांना सद्यःस्थितीचें ज्ञान करून द्यावयाचें, त्यांचे हक्क त्यांना समजावून द्यावयाचे, आपल्या पक्षाचीं वर्तमानपत्रें त्यांना वाचून दाखवावयाचीं, वेळोवेळीं गुप्तपत्रकें काढून त्यांचा खेड्यापाड्यांतून प्रसार करावयाचा, वरील गटांतील चळवळ्यांचा कार्यक्रम अशा प्रकारचा होता. या तरुणतरुणींना ही सर्व चळवळ अर्थातच गुप्तपणानें करावी लागत होती. या गटातर्फे प्रसार करण्यांत येत असलेलीं हँडबिलें असोत, वर्तमानपत्रें असोत वा पत्रकें असोत त्या सर्वांना पुस्तकें म्हणावयाचें असाच प्रघात शेतकरी मंडळींत पडला होता. तेव्हां या सर्व चळवळीचा शेतकरी समाजावर कांहींच परिणाम झालेला नव्हता असें म्हणतां यावयाचें नाहीं. "भाकरी द्या" ही रशियांतील या कालच्या शेतकऱ्यांची घोषणा होती त्याचप्रमाणें "जमीन"

" जमीन " " जमिनदारांच्या जमीनी जप्त करा " अशा घोषगांचाही ते पुरस्कार करीत होते. कॉन्स्टॅन्टिनोग्राड भागांतील लिशा नांवाच्या खेड्यांतून या चळवळीचीं सर्व सूत्रें हालत असत. शेतकरी वर्गांत चालू असलेल्या या गुप्त चळवळीला दडपून टाकण्याकरितां झारच्या सरकारचे गुप्त पोलिसखात्याचे लोक पुरावे गोळा करीत त्यावेळीं " या चळवळीचे धागेदोरे लिशा गांवांपर्यंत पोंचतात खरे पण त्यापुढें मात्र कांहीं पत्ता लागत नाहीं. अशी तक्रार या खात्यांतील नाणावलेले अधिकारीही करीत असत. खारकोव युनिव्हर्सिटीचा एक विद्यार्थी व या गटाचा पुढारी अलेक्झांको याच्या सर्व हालचाली गुप्त राखण्याबद्दल चळवळींतील शेतकरी अत्यंत काळजी घेत. आणि शेतकऱ्यांच्या कड्या एकनिष्ठेमुळें अलेक्झांकोचा पोलिसला शेवटपर्यंत पत्ता सुद्दा लागला नाहीं. क्रांतिकारकांच्या गुप्त कटांत शिरून त्यांचीं कृत्यें व बेत उघडकीस आणावयाचे, असलीं बेमानगिरीचीं कृत्यें करणारे लोक मध्यम वर्गांत व कामगार वर्गांत निघाले पण शेतकरी वर्गांत मात्र असली बेइमानी कोणीही आचारली नाहीं असें लेनिननें एके ठिकाणीं म्हटलें आहे. जीव धोक्यांत घालून गुप्त चळवळी करणाऱ्या तरुणासंबंधानें शेतकरी वर्गांतील लोकांना अतिशय आदर वाटत होता व त्यांच्या तर्फे प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांवर तर त्यांचा फारच विश्वास होता. उपासमारीनें व पिळणुकीनें गांजलेल्या शेतकऱ्यांत अशा रीतीनें गुप्त मतप्रचार करणारे सोशॅलिस्ट रेव्होल्यूसरी, मेनशेविक व बोलशेविक असे तिन्ही पक्षाचे लोक होते. क्रांति घडवून आणावयाची असेल तर ती गोष्ट शेतकरी लोकच करूं शकतील असा सोशॅलिस्ट रेव्होल्यूशरी पक्षांतील तरुणांचा पूर्ण विश्वास होता व क्रांति यशस्वी करण्यास वैयक्तिक

खून करून दहशतवादाचाच अवलंब केला पाहिजे असें त्यांचें मत होतें. क्रांतीच्या चळवळींतील एका विशिष्ट मर्यादेपर्यंत शेतकरी-समाजाचा उपयोग होईल, यापुढें शेतकऱ्यांचा उपयोग केल्यास क्रांतिकार्यांत ते विघ्न उत्पन्न करतील असें मेनशेविकांचें म्हणणें होतें. देशांतील कामगार वर्ग हाच खरा क्रांतिकारी वर्ग आहे व शेतकरी त्यांचा दोस्त म्हणून त्यांना मदत करील असें बोलशेविकांचें सांगणें होतें. सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षाचा दहशतवाद शेतकऱ्यांनाच पसंत पडला नाहीं. मेनशेविकांनीं शेतकऱ्यांना फारसें जवळ केलें नाहीं. बोलशेविकांची विचारसरणी मात्र शेतकरी समाजाला पूर्णपणें पसंत पडली व मध्यंतरी कांहीं काल-पर्यंत बोलशेविकांच्या लष्करी समाजवादी धोरणाला शेतकऱ्यांनीं विरोध केला तरी अखेरीस बोलशेविकांच्या धोरणालाच त्यांनीं पाठिंबा दिला. राष्ट्रांतील सुशिक्षित क्रांतिकारी तरुणांच्या मत-प्रचारामुळें रशियाचा शेतकरी देवाला विसरावयास तयार झाला पण झारवरील त्याचा विश्वास मात्र हे तरुण नष्ट करूं शकले नाहींत. हें काम खुद्द झारच्या अधिकाऱ्यांनींच केलें. खेड्यांच्या एकाद्या गटांत या चळवळीला ऊत आला व तिला दडपून टाकण्याकरितां कोसॅक घोडेस्वारांची तुकडी रवाना करण्यांत आली तर "आमच्यावर गोळीबार करण्याची तुमची छाती नाहीं, कारण झारनेंच आमच्यावर गोळीबार करण्यास मनाई केलेली आहे असें या कोसॅकांना उद्देशून चळवळींतील शेतकरी म्हणत असत. "विश्वांत निसर्ग ही एकच एक शक्ति आहे, ईश्वर नाहीं. पण झार मात्र आमचा पूर्ण कैवारी आहे. आमच्या बाबतींत कसें धोरण ठेवावयाचें हें विचारण्याकरितां तो आपल्या सासूकडे गेला आहे" असे उद्गार एका शेतकऱ्यानें यावेळीं

काढले म्हणतात. पण शेतकऱ्यांवर ज्यावेळीं बंदुकांच्या फैरीवर फैरी झडूं लागल्या व या गोळ्यांना शेतकरी एकामागून एक ज्यावेळीं पटापट बळी पडूं लागले त्यावेळीं त्यांचा झारवरील विश्वास उडाला. जी गोष्ट सुशिक्षित क्रांतिकारी तरुणांना करतां आली नाहीं ते कार्य झारच्या लष्करी अधिकाऱ्यांनीं केलें व झारवरच्या औदार्याबद्दल शेतकरी वर्गांतील लोकांना वाटणारा मोह त्यांनीं नष्ट करून टाकला. झारचे लष्करी व पोलिस अधिकारी शेतकरी समाजावर नुसता गोळीबार करूनच थांबले नाहींत तर शेतकऱ्यांची चळवळ बंद पडली, ते गांवोगांव निघून गेले, दंगा शमला, शांतता झाली असें असतांनासुद्धां या अधिकाऱ्यांनीं आपल्या सैनिकांबरोबर पोल्टावा प्रांतांतील निरनिराळ्या खेड्यांवर छापे घातले व दंगा होऊन गेल्यानंतर पंधरा तीन वारांनीं या खेड्यांतील तरुणांना पकडलें व त्यांना प्रत्येकीं २०० फटके लगावले. एका ६५ वर्षांच्या म्हाताऱ्याला त्याच्या वयाइतकेच फटके मारण्यांत आले. फटके मारतांना एका शेतकऱ्यानें झारच्या दयाळूपणासंबंधानें उद्गार काढले त्याबरोबर त्यांना आणखी ५० फटके मारण्यांत आले. बंडखोर शेतकऱ्यांच्या प्रांतांवर ८००००० रुबलांचा दंड लादण्यांत आला पण हा दंड वसूल होऊं शकला नाहीं. १९०४ सालीं झारच्या हुकुमानें दंडाचा हुकूम परत करण्यांत आला. या दंडापैकीं एक पैही वसूल झाली नाहीं. १९०० पासून ते १९०५ पर्यंत रशियांतील बहुतेक सर्व शेतकऱ्यांच्या लहानमोठ्या चळवळी व बंडें झालीं व तीं सरकारला पूर्णपणें दडपून टाकतां आलीं नाहींत हें पाहून "विद्यार्थ्यांच्या चळवळी दडपून टाकतां येतील, कामगार चळवळींचाही नायनाट करतां येईल पण शेतकरी जर कां बिथरले तर त्यांच्यापुढें सरका-

रचें कांहीं चालवयाचें नाहीं. सर्वत्र उलथापालथ होऊन जाईल" असे उद्गार झारच्या सरकारी अधिकाऱ्यांनींच काढले असें म्हणतात.

याप्रमाणें राष्ट्रांतील शेतकरी वर्ग बिथरून गेलेला पाहून त्याला शांत करण्याकरितां त्या वेळचा मुख्य प्रधान विटे यानें शेतीसुधारणेची एक योजना तयार केली पण झारला ती पसंत पडली नाहीं. अशा प्रकारच्या सुधारणापेक्षां लष्करी सैनिकांच्या तुकडींवरच झारचा अधिक विश्वास होता. १ मार्च १८८१ रोजीं दुसऱ्या अलेक्झांडरचा खून झाला. या खुनाच्या कल्पनेचें भूत झारच्या मनावर स्वार झालें होतें आणि या खुनाच्या भीतीपासून रक्षण करण्यास लष्करी सैनिकाशिवाय आपला दुसरा कोणी त्राता नाहीं असें झारला वाटूं लागलें होतें. झारला आपली योजना पसंत पडली नाहीं हें पाहून विटेनें राजीनामा दिला व दंडुकेशाहीचा भोक्ता असलेला प्लेहेव त्याच्या जागीं मुख्य प्रधान झाला. झारप्रमाणें रशियांतील जमिनदारांचाही पोलिस व लष्कर यांच्या दंडुकेशाहीवरच विश्वास होता. यामुळें उपासमारीनें खवळून गेलेल्या शेतकऱ्यांना कांहीं आर्थिक सवलती देण्याचें बाजूलाच राहिलें. शेतकऱ्यांना गोळ्या चारण्यांत आल्या व त्यांच्या पाठीं फटके मारून त्या सोलण्यांत आल्या शेतकऱ्यांच्या जादा जमिनीच्या मागणीला जमिनदार वर्गानें मुळींसुद्धां भीक घातली नाहीं.

झार व त्याचे सरदार व जमिनदार यांच्या वरील धोरणामुळें शेतकरी समाजाच्या संतापाग्नींत तेलच ओतल्याप्रमाणें झालें. १९०५ च्या रशियांतील पहिल्या क्रांतीच्या कालांत शहरांतील कामगारांचे प्रचंड संप चालू होते. कारखान्यांतून व रेल्वेवर सुरूं असलेल्या संपाच्या बातम्या खेडेगांवांत येऊन थडकत होत्या. ९ जानेवारीच्या लाल रविवारच्या बातमीनें तर सर्व रशियाच

हादरून गेला होता. तेव्हां या खळवळीनें पुन्हां शेतकऱ्यांना बंडाचें निशाण उभारण्यास प्रवृत्त केलें असल्यास त्यांत कांहीं नवल नव्हतें. कारखाने, रेल्वे व कोळशांच्या खाणी यांतून संप करून बाहेर पडलेले व बेकार झालेले कामगार खेड्यापाड्यांतून परत आले व शहरांतून जी चळवळ चालू होती तशाच प्रकारची चळवळ करण्यास त्यांनीं शेतकऱ्यांना चिथावणी दिली. " मॅनेजरांना हांकून द्या व त्यांची जागा तुम्ही घ्या " असे कामगार शेतकऱ्यांना सांगत गांवोगांव फिरूं लागले. "जमीन तुमची आहे, तुम्ही आतां पाहिजे तें करूं शकता " अशी चिथावणी टिमोथी नांवाच्या एका कारखान्यांतील कामगारानें दिली. " जमिनदार, मठ, चर्च यांच्या ताब्यांत असलेल्या जमिनी परत हिसकावून घेतल्याच पाहिजेत. सरकारी जंगलाच्या बाबतींतहि तेंच धोरण स्वीकारलें पाहिजे, सरकारी कर भरूं नये, " असा उपदेश पुढारी करूं लागले. सरकारनें नेमलेला खेडेगांवांतला एक मॅजिस्ट्रेट या क्रांतीच्या चळवळींत गुप्तपणें सामील झाला. हा मॅजिस्ट्रेट खेड्यांतील लोकांना बाहेरचीं वर्तमानपत्रें वाचून दाखवीत असे. एका प्रसंगीं वर्तमानपत्रें वाचण्याचें मिष करून त्यानें आपलेंच पुढील आशयाचें व्याख्यान आपल्यापुढें बसलेल्या श्रोत्यांना चारलें. " समाजांत समता प्रस्थापित करण्याची वेळ आतां आली आहे अशीं सर्व वर्तमानपत्रें आतां म्हणूं लागलीं आहेत ही समता प्रस्थापित झाल्यास ईस्टरच्या सणाप्रमाणें आपण आनंदीआनंद प्रदर्शित करूं. यावेळीं लोक आनंदानें नाचूं लागतील व एकमेकांस आलिंगनें देतील. जमीनदार व सावकार यांच्याकडून जमीनी काढून घेण्यांत येतील व शेतकऱ्यांना त्या सारख्या प्रमाणांत वांटून दिल्या जातील. ज्या जमिनदारांकडून व सावकारांकडून

जमीनी घेतल्या जातील त्यांना पगार देण्यांत येईल. " याप्रमाणें बाहेर शहरांतून चालू क्रांतीकारक चळवळीचा व खेडयांतून चालू असलेल्या वरील विचारसरणीच्या प्रचाराचा व्हावा तोच परिणाम झाला, कुळवाडी गुलामगिरीच्या कालात आपल्या बापजाद्यांवर जमिनदार वर्गानें जो जुलूम केला. त्याचा सूड उगविण्याची व आपल्या जमीनी पुन्हां परत आपल्या ताब्यांत घेण्याची भाषा शेतकरीहि बोलूं लागले. सामान्य जनतेच्या वाचेंत व कृतींत कधींच फारसें अंतर पडत नसतें. हे शेतकरी मोठमोठे जमाव करूं लागले. जमिनदारांच्या जंगलांतील झाडन्‌झाड त्यांनीं तोडून टाकलें व त्यांच्या वाडयांना आगी लावल्या. " शेतकऱ्यांची चळवळ झपाट्यानें वाढत चालली आहे. जमिनदारांच्या वाडयांची शेतकरी सर्रास नासधूस करीत असून जमिनदार लोक गांवें सोडून पळून जात आहेत. लष्करी मदत अपुरी पडत आहे, शेतकऱ्यांचें मन वळविण्याचे सर्व प्रयत्न फुकट गेले आहेत, आणखी लष्करी तुकडया पाठवून द्या. त्याचीच फार जरूरी आहे" अशा मागण्या खेडयांच्या भागांत नेमण्यांत आलेल्या झेमस्टोव (मॅजिस्ट्रेट) मंडळाकडून सरकारास पाठविण्यांत आल्या. " सर्व परिस्थिती आम्हांला कळून चुकली आहे पण आपण कांहीं करूं शकत नाहीं " अशीं उत्तरें प्रधानमंडळाकडून पाठविण्यांत आलीं. पेट्रो-व्हस्क व सर्डोव्हस्क भागांतील आमचे सर्व वाडे लुटण्यांत आले व जाळून टाकण्यांत आले. शेतकरी समाजांतील चळवळ्ये सशस्त्र असून ते युनिफॉर्ममध्यें सर्वत्र फिरूं लागले आहेत. आमच्या संरक्षणाची कांहींच तजवीज नाहीं. लष्कर फारच थोडें आहे. आम्हांला जर मदत न मिळाली तर सर्व प्रांत धुळीला मिळेल. " ही तार वीस जमिनदारांनीं सरकारकडे पाठविली पण तिचाही

उपयोग झाला नाहीं. १९०५ अखेरच्या महिन्यांत रशियांत सर्वत्र असा धुमाकूळ माजला होता. १९०६ सालीं सरकारनें शहरांतील कामगारांच्या चळवळी जवळजवळ दडपून टाकल्या पण खेड्यांतील चळवळी तें दडपून टाकूं शकलें नाहीं. १९०६ च्या मे ते आगस्ट अखेरपर्यंतच्या चार महिन्यांत ही चळवळ अगदीं शिगेला पोंचली. या दिवसांत रशियांतील जवळजवळ सर्व प्रांतांत एकंदर ७५० दंगे झाले. शहरांतील कामगारांच्या नेतृत्वाखालीं या क्रांतिकारक चळवळी चालू होत्या तरी त्या कांहीं विशिष्ट पद्धतीनें चालू होत्या हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. शेतकरी लोकांनीं या सर्व चळवळींत आपली अनत्त्याचाराची वृत्ति ढळूं दिली नाहीं. जमिनदारांच्या वाड्यावर हल्ला चढविण्या-पूर्वी ते त्याला वाडा सोडून जाण्याबद्दल निरोप पाठवीत असत. या निरोपाप्रमाणें जमिनदार वाड्याबाहेर पडला तर ठीकच परंतु तो वाड्याबाहेर पडला नाहीं तर प्रथम त्याला वाड्याबाहेर काढ-ण्यांत येत असे व व्यक्तिशः त्याच्यावर व बायकामुलांवर कोणत्याही प्रकारचा अत्याचार होतां कामा नये अशी खबरदारी घेण्यांत येत असे. जमिनदाराला याप्रमाणें वाड्याबाहेर काढल्यानंतर त्याच्या वाड्यांतील धान्य ताब्यांत घेऊन ते शेतकरी लोक आपापल्यांत वांटून घेत असत. यानंतर सर्व शेतीचीं जनावरें ताब्यांत घेऊन जमिनदाराच्या शेतावर काम करणाऱ्या व घरगुती कामें करणाऱ्या मजुरांना मोकळें करण्यांत येत असे व शेवटीं सर्व वाड्याला व इस्टेटींतील इमारतींना आग लावून देण्यांत येत असे. जमिनदारांच्या इमारती जाळून टाकण्याच्या बाबतींत हे शेतकरी पुढील दोन कारणें सांगत असत. (१) या इमारती जाळून टाकल्यास जमिनदारांना पुन्हां आपल्या इस्टेटीवर येऊन

राहतां येणार नाहीं आणि आपण ठरविलेली जमिनींची वांटणी वगैरे करण्याची योजना निर्विघ्नपणें पार पाडतां येईल, (२) या इमारती तशाच मोकळ्या व शाबूत ठेवल्या तर कोसॅक शिपायांना दडून राहण्याला ती एक सोयीस्कर जागाच होऊन बसेल, म्हणून या सर्व चळवळींत जमिनदारांच्या सर्व इमारती जाळून उध्वस्त करण्यावरच सर्व भर देण्यांत आला. आपल्या चळवळीला यश मिळवावयाचें असेल तर जमिनदारांच्या राहण्याच्या जागा प्रथम जाळून टाकल्या पाहिजेत असे या चळवळींतील तरुण शेतकऱ्यांचें मत होतें.

पण ही शेतकऱ्यांची चळवळ सरकारच्या दडपशाहीपुढें फार दिवस तग धरूं शकली नाहीं. शहरांतील कामगारांच्या चळवळी दडपून सरकारी लष्करानें खेडेगांवांकडे आपला मोर्चा वळविला. "शेतकऱ्यांचे दंगे अत्यंत कडक उपाय अमलांत आणून मोडून काढा. ज्या खेड्यांतून दंगे सुरूं झाले तीं खेडीं जमिनदोस्त करा, व दयामाया न ठेवतां बंडखोरांचा नायनाट करा." अशा तारा मुख्य प्रधानामार्फत सर्वत्र पाठविण्यांत आल्या. वरील हुकुमा-प्रमाणें अर्थातच सर्वत्र गोळीबार व पकडापकडी सुरूं झाली. कांहीं ठिकाणीं शेतकऱ्यांनींही सशस्त्र होऊन लष्करी शिपायांना तोंड दिलें तर कांहीं ठिकाणीं या शिपायांनींही निःशस्त्र शेतक-ऱ्यांवर गोळीबार करण्याचें नाकारलें. 'शेतकरी आपल्याला जमीन मिळावी म्हणून सरकारशीं भांडत आहेत त्यांच्यावर गोळ्या झाडूं नका.' असा उपदेश हे शिपाई परस्परांना करीत होते. लटविया व जॉर्जिया या भागांतील शेतकऱ्यांच्या चळवळीलाच तेवढें सशस्त्र बंडाचें स्वरूप प्राप्त झालें होतें. यामुळें इकडील चळवळ पूर्णपणें मोडण्यास बरेच दिवस लागले. १९०७ सालीं सर्व वर्षभर मिळून

रशियांत शेतकऱ्यांचे लहानमोठे २००० दंगे झाले तरी या सालच्या अखेरीस सर्वत्र शांतता प्रस्थापित करण्यांत आली यांत शंका नाहीं.

१९०५ सालीं रशियांतील कामगारांनीं व शेतकऱ्यांनीं केलेला क्रांतीचा प्रयत्न फसला. त्यावेळचा मुख्य प्रधान स्टॉलिपीन यानें शेतकऱ्यांना संतुष्ट करण्याकरितां एक योजना तयार करून ती डयूमा सभेकडून मंजूरही करून घेतली. स्टॉलिपीनच्या या योजने- मुळें खेडयांतील प्रत्येक शेतकऱ्याला जमिनीची खरेदीविक्री कर- ण्याचा हक्क मिळाला व तिच्यावर आपली वैयक्तिक मालकीही निर्माण करतां आली तरी ग्रामपंचायतीचें गांवावरील वजन कमी झालें. स्टॉलिपीनला हेंच पाहिजे होतें. पंचायतीच्या रूपानें अस- लेली गांवांतील एकी त्याला फोडावयाची होती व हा त्याचा उद्देश या योजनेनें साध्यही झाला. खेडयांतील प्रत्येक शेतकरी आपापल्यापरी आपल्या लहानमोठ्या शेतांच्या तुकड्यांचा पूर्ण मालक झाला व पंचायतीला तो जुमानीनासा झाला. अर्थात् यापुढें गावांत कोणी पुढारी उरला नाहीं. या परिस्थितीचा गावांतील कुलकांनीं–शेतकरी सावकारांनीं–मात्र चांगलाच फायदा घेतला. स्टॉलिपिनच्या योजनेमुळें ग्रामपंचायत जवळजवळ नष्ट झाली व तिची जागा कुलकांनीं पटकावली. रशियाचा शेतकरी आणखी अधिकच कंगाल बनला. १९०७ नंतर एकदोन वर्षे रशियांतील शेतकरी वर्ग सरकारी दडपशाहीमुळें नामोहरम झाल्या- सारखा दिसला खरा, पण ही परिस्थिति फार दिवस टिकून राहणें शक्यच नव्हतें. १९१० सालीं शेतकऱ्यांच्या चळवळींना पुन्हां तोंड लागलें. या सालांत देशांत लहानमोठे मिळून ६२७५ दंगे झाले व १९११ मध्यें ही संख्या ४५६७ वर आली. यानंतर

शेतऱ्यांच्या चळवळीला पुन्हां ओहटी लागली. नंतर पुन्हां महा-युद्धाच्या कालांत रशियांत जी क्रांतीची धुमाळी माजली तींत तेथील शेतकरीही सामील झाला व क्रांतिकारक कामगारांना साहाय्य करून रशियांतील क्रांतीचें कार्य त्यानें यशस्वी रीतीनें पार पाडलें.

सामुदायिक शेती

१९१७ च्या क्रांतिकालांत शेतकऱ्यांना फारशी चळवळ करावी लागली नाहीं. १९०० पासून तें १९१२ पर्यंत त्यांनीं प्रचंड चळवळी केल्या होत्या व त्यामुळें त्यांची क्रांतीची भूमिका तयार झाली होती. राज्यांची उलथापालथ व्हावयाची, एक सत्ता नाहींशी होऊन त्या ठिकाणीं दुसरी सत्ता प्रस्थापित व्हावयाची असली तर ही क्रांतीची चळवळ शहरांतूनच होत असते. वरील नियमाप्रमाणें रशियांतील हें क्रांतियुद्ध शहरांतील कामगारांनीं यशस्वी रीतीनें लढविलें. या क्रांतिकारी कामगारांना सैनिक येऊन मिळाले व या दोन्ही प्रचंड शक्तींनीं एकजूट होऊन झार-शाहीची सत्ता समूळ नष्ट केली. पेट्रोग्राड, मास्को वगैरे मोठमोठीं राजधानीचीं शहरें व औद्योगिक केंद्रें काबीज केल्यानंतर राष्ट्रां-तील जमिनी जमिनदारांच्या व कुलकांच्या हातून काढून घेऊन त्या समाजाच्या मालकीच्या करण्याचें काम पूर्वींच जागे झालेल्या संघटित शेतकऱ्यांनीं बिनबोभाट केलें. सर्व राज्यसत्ता सोविएटां-च्या हातीं घेणें, सर्व कारखाने समाजाच्या ताब्यांत घेणें, त्याच-प्रमाणें सर्व जमीन समाजाच्या मालकीची करणें, या घोषणांना

अनुसरून रशियांतील शेतकऱ्यांनीं गांवोगांवच्या जमिनी जमिनदारापासून काढून घेतल्या व गांवोगांव सोविएट (पंच) निर्माण करून त्यांच्या देखरेखीखालीं गांवांतील शेतकऱ्यांना त्यांच्या त्यांच्या गरजांप्रमाणें वांटून दिल्या. क्रांतीच्या या दिवसांत लेनिनने जमिनीसंबंधाचें हुकूम जाहीर करावे व त्या हुकुमांची अंमलबजावणी शेतकऱ्यानीं करावी असें चालू होतें. महायुद्धांत ठिकठिकाणीं आपटी मिळाल्यामुळें व देशाच्या अंतर्गत कारभारांत अत्यंत घोटाळे माजल्यामुळें झारचें मध्यवर्ती सरकार दुबळें झालें होतें. शहरांतून सुरू झालेल्या क्रांतीच्या चळवळींना आळा घालण्याचें सामर्थ्य राहिलें नव्हतें. मग खेड्यांपाड्यांतून सर्वत्र सुरू झालेल्या क्रांतीला तें कसें थोपवून धरणार? १९०५-७ सालीं रशियांतील असंतुष्ट शेतकऱ्यांनीं आपल्या जमिनी परत मिळविण्याकरितां सर्वत्र प्रचंड चळवळी केल्या. त्यावेळीं जमिनदारांवर व त्यांच्या कुटुंबावर कोणत्याही प्रकारचे अत्याचार होऊं नयेत अशी त्यांनीं काळजी घेतली होती. तथापि कांहीं ठिकाणीं शेतकऱ्यांनीं सशस्त्र होऊन ही चळवळ केली व सरकारी लष्कराला तोंड दिलें त्यामुळें थोडाबहुत अत्याचार त्यांच्या हातून घडला. पण १९१७ च्या क्रांतीच्या युद्धांत मात्र रशियन शेतकऱ्यांनीं कोणाही जमिनदारांवर हात टाकला नाहीं. एवढ्या प्रचंड चळवळींत कांहीं उदाहरणें घडून आलीं असलीं तरी तेवढ्यावरून या चळवळीचे नेते अत्याचाराचे पुरस्कर्ते होते किंवा रक्तपात करण्याची त्यांना हौस होती असें केव्हांही म्हणतां यावयाचें नाहीं. देशांत सर्वत्र क्रांतीची रणधुमाळी माजली आहे, मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाली आहे, आपलें संरक्षण करण्यास ती सर्वथैव असमर्थ झाली आहे असें पाहतांच खेडोंपाडीं राहणारे जमिनदार स्वतः

होऊनच शेतकऱ्यांनीं क्रांतीचें निशाण उभारतांच आपण होऊन आपला जमीनजुमला व इस्टेटी सोडून गेले व कांहीं जमिनदार क्रांतिकारकांना शरणही गेले. या क्रांतीच्या वेळीं सर्व जमीन समाजाच्या मालकीची करण्यांत आली व जमिनदारांना मुळींसुद्धां नुकसान भरपाई देण्यांत आली नाहीं. सोवीएट सरकारच्या या धोरणामुळें पिढ्यानुपिढ्या सुखांत वाढलेल्या जमिनदार व सरदार घराण्यांतील लोकांना हालअपेष्टा सोसाव्या लागल्या व निर्द्रव्य होऊन परदेशचा मार्ग त्यांना सुधारावा लागला.

याप्रमाणें १९१७ ची क्रांति रशियांतील शेतकऱ्यांनीं यशस्वी केली खरी पण क्रांतीनंतर प्रस्थापित झालेल्या सोविएटांच्या सत्तेला बळकटी आणण्याच्या कामीं मात्र या शेतकऱ्यांनीं करावी तशी मदत केली नाहीं. क्रांतीनंतरच्या तीनचार वर्षांत सोविएट रशियावर अनेक आपत्ति कोसळल्या. जगांतील साम्राज्यवादी राष्ट्रांनीं सोविएट सत्तेचा नायनाट करण्याचा चंग बांधला, रशियावर चोहोंकडून स्वाऱ्या करण्यांत आल्या, रशियावर बहिष्कार टाकण्यांत आला, बाहेरचा माल रशियांत जाऊं देण्याची बंदी केली. यांतच दुष्काळ पडून रशियांतील जनतेवर उपासमारीची पाळी आली. अशा प्रसंगीं सोविएट सरकारला रशियांतील शेतकऱ्यांनीं मदत करण्याऐवजीं वेळोवेळीं विरोधच केला. या परिस्थितींत शेतकऱ्यांजवळ त्यांच्या जरूरीपुरतें धान्य ठेवून बाकी सर्व धान्य जबरदस्तीनें वाहून नेण्याचे हुकूम सोविएट सरकारला करावे लागले प्रतिकारक्षम झालेल्या शेतकऱ्यांनीं या वेळीं दूरवर विचार केला नाहीं. आपल्या जरूरीपुरतेंच धान्य त्यांनीं पिकविण्यास सुरवात केली, आपलीं जनावरें त्यांनीं मारून टाकलीं. पण हें आपसांतील युद्ध लवकरच थांबलें. दोन्ही पक्षांनीं माघार

घेतली. सोविएट सरकारनें लष्करी समाजसत्तावादाचें धोरण परत घेतलें व शेतकऱ्यांनींही सरकारला मदत करण्याची तयारी दाखविली.

पण सोविएट सरकारची सत्ता दृढमूल होण्यास व सोविएट रशियाची भरभराट होण्यास रशियांतील शेतकऱ्यांनीं यापुढें आणखी एक पाऊल टाकलें पाहिजे अशी सोविएट पुढाऱ्यांची इच्छा होती. रशियांतील सर्व जनतेला पोटभर अन्न, अंगभर वस्त्र राहण्यास प्रशस्त जागा, मिळावयाची असल्यास व त्याचप्रमाणें रशियांतील बेकारी पूर्णपणें नष्ट करावयाची असल्यास रशियांतील कच्च्या मालाची पैदास वाढली पाहिजे व देशांतील उद्योगधंदेही वाढले पाहिजेत ही गोष्ट कोणालाही मान्य होण्याजोगी होती. रशियाची वरीलप्रमाणें सर्वतोपरी भरभराट व्हावयाची असल्यास रशियाच्या शेतकऱ्यानें यापुढें वैयक्तिक शेती करण्याचें सोडलें पाहिजे. सर्व आधुनिक शोधांचा उपयोग करून सामुदायिक रितीनें मोठ्या प्रमाणावर शेती करण्यास त्यानें तयार झालें पाहिजे असा मतप्रचार सोविएट सरकारनें सुरू केला होता. आपल्या शेताच्या तुकड्यावरची खासगी मालकी सोडावयाची ही गोष्ट रशियाच्या शेतकऱ्यांना प्रथमतः कशीशीच वाटली. पण सामुदायिक शेतीचे फायदे त्यांना जसजसे प्रत्यक्ष कळून आले तसतशी खाजगी मालमत्तेची कल्पनाही त्यांनीं सोडून दिली. सामुदायिक शेतीकरितां कोणाही शेतकऱ्यांकडून सोविएट सरकारनें जबरदस्तीनें जमीन घेतली नाहीं. प्रचंड प्रमाणावर मतप्रचार करून व सरकारी जमिनीवर हे प्रयोग प्रत्यक्ष करून दाखवून सरकारनें शेतकऱ्यांचीं मनें आपल्याकडे वळविलीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

क्रांतीनंतर सोविएट सरकारची सत्ता दृढमूल करण्याकरितां कशा प्रकारचे सामोपचाराचे प्रयत्न करण्यांत आले, सोविएट रशियाबद्दल शेतकऱ्यांचें मत काय होतें व या सरकारच्या राजवटींत शेतकरी वर्ग आपुलकीच्या भावनेनें आज कसा नांदत आहे, याची स्पष्ट कल्पना यावी म्हणून मि. ई. जी. डिलन नांवाच्या प्रसिद्ध इंग्रजी ग्रंथकर्त्यानें लिहिलेल्या 'आजचा व कालचा रशिया' (Russia today & yestirday) या पुस्तकांतील प्रश्नोत्तरात्मक मुलाखत खालीं दिली आहे.

प्रश्नः–तुमच्या भागांतील शेतकऱ्यांचें सोविएटासंबंधानें काय मत आहे ?

उत्तरः–ते त्यांना मित्राप्रमाणें वाटतात आणि कामगारांनाही तसेंच वाटतें. आम्ही सर्व अद्याप मागासलेलेच आहोंत व हीच गोष्ट स्वाभाविक आहे. परंतु पूर्वीप्रमाणें आतां कूपमंडूक वृत्तीचे मात्र आम्ही राहिलेलों नाहीं. इकडील शेतकरी वाफेचा व विजेचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करीत नाहींत हें तर तुम्हांला दिसतेंच आहे. वाडवडिलांपासून चालत आलेल्या पद्धतीप्रमाणें ते अद्यापि हातानेंच कामें करतात. जुनीं आउतें व बैल याचाच ते जास्त उपयोग करतात म्हणूनच ते इतर लोकांच्या मागें आहेत. जमिनीची मशागत करण्याचीं जुनीं आउतें उपयोगांत आणण्याचें सोविएटांनीं ठरविलें त्यावेळीं सरकारच्या धोरणासंबंधानें शेतकऱ्यांचा गैरसमज झाला. यावेळीं कांहीं व्यक्तींनीं आपल्याजवळचे पैसे घालून नवीं यांत्रिक आउतें उपयोगांत आणण्याचा प्रयत्न केला, परंतु असें करणें म्हणजे भांडवलशाहीला उत्तेजन देण्यासारखेंच आहे, समाजसत्तावादाच्या प्रस्थापनेला हें धोरण विघातक होईल हें जाणून सोविएट सरकारनें त्याला विरोध केला.

तेव्हां कांहीं कुटुंबांनीं आपल्या जवळचे पैसे एकत्र करावे व सर्वांनीं एकविचारानें ट्रॅक्टर व इतर यंत्रसामुग्री जमवावी व आळीपाळीनें तिचा उपयोग करण्यांत यावा असें सांगण्यांत आलें ही पद्धतीच सामुदायिक शेती या नांवानें आतां प्रचलित आहे.

प्रश्नः–कुलकांसंबंधानें तुमचें काय म्हणणें आहे ?

उत्तरः–कुलक हे आमच्यासारखेच शेतकरी आहेत. पण हे लोक आपल्याजवळ पावसाळ्याच्या वेळीं खर्च करण्याकरितां थोडी पुंजी करून ठेवतात. ज्या शेतकऱ्यांनीं स्वतः ट्रॅक्टर खरेदी केले तेही कुलकच होते. जे शेतकरी आपल्या शेतावर मजुरांना कामावर लावतात ते कुलक या नांवानें संबोधले जातात. सोविएट सरकार कुलकांचा हा स्वार्थी व्यवहार चालूं देत नाहीं. शेतकऱ्यांनीं आपल्याजवळची पुंजी सामुदायिक शेती करण्याच्या कामीं उपयोगांत आणावी. सरकारच्या या धोरणाप्रमाणें वागावें तर स्वार्थत्याग करण्याची पाळी येते. अर्थात् ही गोष्ट कुलकांना पसंत पडत नाहीं. मग मतभेद होतात आणि तक्रारींनाही सुरुवात होते. पण याकरितां कुलकांचा छळ करण्यांत आला किंवा त्यांना शिक्षा देण्यांत आल्या हें मात्र खरें नाहीं. माझ्या ऐकिवांत तर अशी गोष्ट नाहीं. कुलकांच्या स्वार्थी धोरणाला आळा घालण्यांत येतो एवढेंच. त्यांच्या प्राप्तीच्या मानानें त्यांच्यावर वैयक्तिक कर बसविण्यांत येतो. गरीब शेतकऱ्यांनीं सामुदायिक शेतींत भाग घ्यावा याबद्दल त्यांचीं मनें वळविण्यांत येतात. कांहीं खेड्यांतील कुलकांनीं सरकारच्या या धोरणाला विरोध केला हें खरें आहे पण असे कुलक आमच्या भागांत तर नाहींत. खेडेगांवांतही गरीब, मध्यम व कुलक असे तीन वर्ग आज पडले आहेत.

प्रश्नः–झार नाहींसे झाले याबद्दल तुम्हाला वाईट वाटलेलें दिसत नाहीं ?

उत्तरः–आम्हाला वाईट वाटलें नाहीं. झारच्या कारकीर्दीत कुत्र्यांच्या जीवनाप्रमाणें आम्हीं आमचें जीवन कंठीत होतों. कांहीं थोडीं माणसें केवळ अपवादात्मक उदाहरणें म्हणून उच्च पदाला चढत असत परंतु हा केवळ नशीबाचा खेळ होता, आपल्याला चांगले दिवस येतील असें कोणालाच वाटत नव्हतें. सामान्य जनतेचें जिणें नरकमय झालें होतें. त्यांच्या हालांना पारावार नव्हता व त्यांचीं अंतःकरणें निराशेनें भरून गेलीं होतीं. काळोखाच्या व दुर्गंधीनें भरलेल्या खोपटांतून खेडूतांना व त्यांच्या कुटुंबांना राहावें लागत होतें. प्रकाश व हवा त्यांना भरपूर मिळत नव्हती, पोटभर खायलाही त्यांना मिळत नव्हतें. त्यांची शक्ति यामुळें कमी होत असे. जीवनाचा झगडा चालविण्याच्या कामीं ते असमर्थ होत असत. व उपासमारीला व सांथीला ते बळी पडत असत. असल्या प्रसंगीं ईश्वर व झार त्यांना मदत करायला कोठून येणार ? त्यावेळीं दवाखानेही नव्हते. असले तर दूरच्या शहरांतून असायचे. बरें त्या ठिकाणीं जावें तर त्यांत या शेतकऱ्यांना ठेवूनही घेत नसत. कांहीं वर्षांपूर्वी कांहीं खेड्यांच्या भागांत पटकीची सांथ पसरणार असें दिसूं लागलें त्यावेळीं सरकारनें काय केलें तुम्हाला माहीत आहे ? या संकटाच्या निवारणाकरितां ८० शवपेटिका तयार ठेवण्यांत आल्या व बरीच खोल व रुंद अशीं थडगीं खोदून ठेवण्यांत आलीं ! वरच्या अधिकाऱ्यांच्या डोक्यांत याशिवाय दुसरा व्यवहार्य विचार आला नाहीं. अशा प्रकारचे प्रसंग पुन्हां येणार नाहींत हें पाहून आम्हाला समाधान वाटत आहे. आणि असल्या आपत्तींतून आमचें कोणी रक्षण केलें

हेंही आम्हांला माहीत आहे. वारंवार पडलेल्या दुष्काळामुळें हजारों शेतकरी मृत्यूमुखीं पडत व गांवेंची गांवें ओसाड होत. पाऊसच पडला नाहीं तर त्याविरुद्ध झारच्या सरकारला कांहीं करतां येत नव्हतें हें खरें परंतु असल्या आपत्कालीं धान्याचा सांठा करून ठेवण्याचें काम त्याला साधलें नाहीं. या बाबतींत त्याला कधींही व कोठेंही यश आलें नाहीं. थंडीनें किंवा टोळधाडीनें मैलोगणती जमिनीवरील पिकें उध्वस्त झालीं व तेथील शेतकरी भिकारी झाले तरी त्या बाबतींत कोणताच उपाय करण्यांत येत नव्हता आणि अशी उपाययोजना कधींकाळीं करण्यांत आली तर ती फारच उशीरा करण्यांत येत असे. असल्या प्रसंगीं झारचें सरकार कोणतेंही उपाय योजीत नसे किंवा लोकांना मदतही करीत नसे आमचीं गाऱ्हाणीं मोठ्यानें बोलण्याचीही सोय नव्हती. असलें कोरडें समाधानही आम्हांला मिळत नव्हतें. असंतोषाचा शब्द तोंडातून बाहेर काढा कीं, जमिनदारानें किंवा पोलिस इन्स्पेक्टरानें तुरुंग दाखविलाच.

आपल्याजवळ जमीन असावी या शेतकऱ्याच्या भुकेची तुम्हाला कल्पना असेल. ही भूक शमविण्याकरितां आपलें सर्वस्व खर्ची घालण्यास तयार असतो. या मोहाला बळी पडून तो जमिनदारांपासून भरमसाट खंडानें कांहीं थोडे एकर शेती करण्याकरितां घेतो. आणि शेतांतून उत्पन्न झालेल्या पिकांवर आपल्या कुटुंबाचें पोषण करतां येईल या आशेनें या शेतांवर तो गुलामाप्रमाणें राबत असतो. झारच्या कारकीर्दींत अशा प्रकारें शेती करणाऱ्या लोकांच्या कुळांत जन्माला येणें म्हणजे एक पापच होतें, या पापाच्या प्रायश्चित्ताची तरवार त्याच्या डोक्यावर सतत लटकलेली असे. अशा परिस्थितींत शेतकऱ्यांनीं किती हाल-

अपेष्टा सहन केल्या असतील. त्यांचें जीवन किती निराशामय झालें असेल याची कल्पनाच केलेली बरी! १९०५–०७ या वर्षांत रशियांत सर्वत्र शेतकऱ्यांनीं बंडें केलीं, आपल्याला गुलाम बनविणाऱ्या लोकांचा त्यांनीं सूड उगविला व त्यांचा छळ केला. रशियांतील शेतकरी यावेळीं अगदीं निराशेनें वेडे झाले होते. झारच्या लष्करानें शेतकऱ्यांचीं हीं बंडें मोडलीं नसतीं तर रशियांतील भांडवलशाहीचें मूळच त्यावेळीं शेतकऱ्यांनीं अजीबात उखडून टाकलें असतें. पण शेवटीं रशियांतील शेतकरी विजयी झालेच !

प्रश्नः–म्हणजे जमिनदारांना आज जें प्रायश्चित्त मिळालें आहे तें योग्यच आहे असेंच तुमचें म्हणणें ?

उत्तरः–कांहीं जमिनदार शेतकऱ्यांशीं मित्रत्वानें वागले असतील परंतु मी फक्त जमिनदारासंबंधानेंच बोलत नाहीं. भांडवलदारांचा एक वर्ग या नात्यानें मी त्याचा उल्लेख करीत आहे. आमच्यावर जीं संकटें आलीं व आम्हांला ज्या हालअपेष्टा सोसाव्या लागल्या त्याला हा वर्गच कारणीभूत झाला. आतां हा वर्ग नाहींसा झालेला असल्यामुळें या वर्गाचें वर्चस्व वाढावें अशी कोण इच्छा करील ? दोन परराष्ट्रीय युद्धांत ते हौसेनें सामील झाले. तसें त्यांनीं केलें नसतें तर त्यांचा नाश इतक्या लवकर झाला नसता भांडवलदार वर्गाच्या या धोरणामुळेंच साम्राज्याच्या इमारतीचा पायाच खिळखिळा झाला. या संधीचा लेनिननें चांगला फायदा घेतला. त्याचें बुद्धिचातुर्य याच वेळीं प्रकट झालें. लेनिननें शेतकरी व कामकरी यांचें सहकार्य घडवून आणलें आणि एकजूट झालेले कामगार काय काय करूं शकतात हें त्यानें दाखवून दिलें. परंतु या बाबतींत आम्हांला काय वाटतें ही गोष्ट

महत्त्वाची नाहीं. मुख्य प्रश्न हा आहे कीं, साम्राज्य व त्याचें कार्य ही नष्ट झालीं असून त्यांचें पुनरुज्जीवन होणें शक्य नाहीं. भांडवलदारांच्या अंतर्गत किंवा बाहेरील शक्ति एकवटल्या तरी ही गोष्ट घडून येणें शक्य दिसत नाहीं.

प्रश्नः–आतांपर्यंत तुम्ही हें जें वर्णन केलें हे तुमचे स्वतःचेच विचार आहेत कीं, या तुमच्या मतांना कांहीं आधार आहेत.

उत्तर.–दोन्हीही गोष्टी खऱ्या आहेत. या गोष्टींचा आम्हीं विचार केला आहे. व त्यांच्यासंबंधानें आम्हाला शिक्षणही दिलें आहे. आमच्या मुलांना समजूं लागल्यापासून त्यांना या गोष्टी शिकविल्या जातात कधींकधीं त्यापूर्वींही यासंबंधानें आमचीं मुलें बडबडूं लागतात. जुन्या पिढींतल्या आमच्या लोकांना फारसें शिकवावें किंवा सांगावें लागत नाहीं. झारशाहीच्या नरकांतून आम्हीं बाहेर पडलों आहों आणि युद्धाच्या भयप्रद संकटांतूनही आम्हीं मुक्त झालों आहों. या दोन्हीं अरिष्टांपासून मुक्त रहावयाचें, तीं आपल्यावर येऊं द्यावयाचीं नाहींत असें आम्हीं ठरविलें आहे, म्हणूनच राजेशाहीविरुद्ध व भांडवलशाहीविरुद्ध झगडण्यास आम्हीं प्रवृत्त झालों आहों. याकरितांच आम्हीं सोविएटांना मदत करण्याचें ठरविलें आहे. रशियांत आतां भांडवलदार राहिलेले नाहींत तथापि शेजारच्या राष्ट्रांतील भांडवलदारांची मदत घेऊन लेनिनचें कार्य हाणून पाडण्याचा ते एकजुटीनें विचार करीत आहेत. भांडवलदारांच्या या नेहमींच्याच जुन्या युक्त्या आहेत. १९१४ च्या महायुद्धांपेक्षांही भयंकर असें युद्ध लवकर होईल. असें आम्हांला दिसत आहे. कागदी तहनामे करून जगांत कायमची [illegible]ण्याचा प्रयत्न राष्ट्रसंघ करीत आहे. परंतु [illegible]च्या या सर्व अनर्थाचें मूळ असलेली भांडवलशाहीच

नष्ट करून राष्ट्रसंघाचें हें ध्येय साध्य करण्याचा आम्हीं प्रयत्न करीत आहों. भांडवलशाहीचा पुरस्कार करणारीं हीं राष्ट्रें आज एकजूट होत चाललीं आहेत. व त्यांना विरोध करूं पाहणारें आमचें राष्ट्र आज एकाकी झालें आहे. ज्या कारणांकरितां जगांत युद्धें होतात त्यांचें मूळ खणून काढण्याचा आमचा उद्देश आहे. परवाच्या जागतिक युद्धांत आमच्या राष्ट्रांतील ८५ लाख सैनिक मृत्युमुखीं पडले २२० लाख जखमी झाले. हें युद्ध बंद करणें हें लेनिनचें पहिलें काम होतें. तें बंद करण्याकरितां कितीही किंमत तो द्यावयास तयार होता. शेतकरी-कामकरी जनतेचें हितसंबंध सुरक्षित राहण्याकरितां " युद्ध बंद करा " अशी लेनिननें घोषणा केली, व तें त्यानें बंद केलें. लेनिनची ही वाणी वरासारखी होती कीं शापमय होती ? लेनिनचें हें कृत्य म्हणजे मानवतेविरुद्ध केलेला गुन्हा आहे. अशीं तुम्हीं नांवें ठेवलीं आणि आम्हीं अत्यंत मौल्यवान देणगी म्हणून त्याचा स्वीकार केला.

प्रश्नः–जमिनीबाबतचा प्रश्न सोविएट सरकारनें ज्या पद्धतीनें निर्णीत केला ती तुम्हाला मान्य आहे काय ?

उत्तरः–आक्टोबरच्या क्रांतीनंतर जमिनदार, सावकार, शेतकऱ्यांवर चरणारे सुखवस्तु व सर्व प्रकारचे भांडवलदार यांचा वर्ग नाहींसा करण्याचा प्रयत्न करण्यांत आला आणि दुसरी गोष्ट म्हणजे कोणत्याही प्रकारचा कारारनामा किंवा भाडेपट्टा न करतां ही सर्व जमीन शेतकऱ्यांना देण्यांत आली ही होय. जमिनीवरील शेतकऱ्यांचा हक्क मान्य करण्यांत आला याचा अर्थ असा कीं ज्याला जी जमीन देण्यांत आली असेल त्या जमिनीची नांगरटी किंवा तिची मेहनतमशागत त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणीही करूं नये असें ठरविण्यांत आलें. जमिनीवरील शेतकऱ्याच्या

हक्काची कल्पना पूर्वी अशीच होती. व तीच आतांही मान्य करण्यांत आली. पण ही बाजूला सारून जमिनीवरील खासगी मालमत्तेचा हक्क मान्य करण्यांत आला असता तर आज या बाबतींत जी प्रचंड सुधारणा करण्यांत आली आहे, ती करतां आली नसती. तशा परिस्थितींत ज्या शेतकऱ्याजवळ थोडीशी पुंजी आहे, ज्यानें थोडे हजार रूबल सांठवून ठेवले आहेत त्यानें जमिनी विकत घेतल्या असत्या व भांडवलशाहीमुळें उद्भवणारीं सर्व अरिष्टें पुन्हां उद्भवलीं असतीं. खासगी मालमत्तेच्या उच्छेदा-वरच आमच्या सुरक्षिततेची सर्व भिस्त आहे. ही गोष्ट सिद्ध करण्यास कांहीं काल जाणें आवश्यक आहे. जितकी जमीन आम्हांला लागवडीस आणतां येईल. तितकी सर्व जमीन आज आम्हांला मिळाली आहे. वरील गोष्ट सिद्ध होण्यास किती दीर्घ काल लागेल याची काळजी करण्याचें आम्हांला कारण नाहीं. कारण या जमिनी आम्हीं आमच्याजवळ ठेवूं शकतो. व त्यांवर मेहनतमशागतही आम्हीं करूं शकतो व आमच्या पश्चात् आमच्या मुलांनाही त्या जमिनी मिळतात. शिक्कामोर्तब केलेल्या करारनाम्यांची किंवा भाडेपट्ट्यांची जरूरी काय ?

झारच्या राजवटींत सरासरी ५०० एकर जमीन एकेका जमीन-दारापाशीं होती आणि शेतकरी कुटुंबाजवळ सरासरी १०।१२ एकर जमीन होती असें आम्हांला निरनिराळ्या व्याख्यानांच्या, वर्तमानपत्रांच्या व पुस्तकांच्या द्वारा सांगण्यांत आलें आहे. पुन्हां तीच परिस्थिती परत निर्माण व्हावी याकरितां आम्हीं झुरत राहिलों आहों असें समजूं नका. आक्टोबरच्या क्रांतीनंतर भांडवल-दारांच्या ताब्यांत असलेली १५ अब्ज रूबल किंमतीची १५ कोटी एकर जमीन शेतकऱ्यांच्या स्वाधीन करण्यांत आली, या

सर्व जमिनीकरितां आम्हा शेतकऱ्यांना एक पैही द्यावी लागली नाहीं. रशियांत आज जी जमीन आहे. त्यापैकीं शें. ९६ इतकी जमीन आम्हीं आतां पिकवीत आहों हें तुम्हांला माहीत आहे?

आक्टोबरच्या क्रांतीनंतर शेतकरी व कामकरी यांची स्थिती अनेक परींनी सुधारली आहे. सरकारनें शेतकऱ्यावर थोडा कर बसविला असला तरी दुसऱ्या अनेक प्रकारांनीं शेतकऱ्याचा बोजा कमी करण्यांत आला आहे. आपसांतील युद्ध चालू असतांना पैशाचा ज्यावेळीं तुटवडा पडला त्यावेळीं शेतीचीं औतें, खत व बीं विकत घेण्याकरितां लाखों रुबल शेतकऱ्यांना वाटण्यांत आले. नेहमींच फायदेशीर असलेल्या घरगुती धंद्यांना उत्तेजन देण्यांत आलें. जमीन गहाण टाकूं नये म्हणून अगदी गरीब शेतकऱ्यांना लांब मुदतीनें कर्जाऊ रकमा देण्यांत आल्या. कांहींना पांच वर्षेपर्यंत तर कांहींना तीन वर्षेपर्यंत कोणत्याही प्रकारचा कर माफ करण्यांत आला. या हलाखीच्या दिवसांत कसेंबसें जगण्याकरितां जोराची धडपड करणाऱ्या शेतकऱ्यांना पतीवर माल देण्यांत आला. स्वर्गातून अमृताचा वर्षाव व्हावा त्याप्रमाणें या मदतीबद्दल धन्यता वाटली.

कुळें या नात्यानें आमची लुबाडणूक चालू नसून सोविएट युनियनचे आम्हीं सत्ताधारी आहोंत असें आम्हांला वाटत आहे. सरकारी अधिकाऱ्यांच्या निवडणुकीच्या बाबतींत प्रत्येकाला आपलें मत व्यक्त करतां येतें आणि खेडेगांवातला मजूर व शहरांतला मजूर यांची सुधारणा होईल या दृष्टीनेंच प्रत्येक गोष्ट केली जाते. काहीं वेळां चुकाही होतात. परंतु जनतेचें कल्याण झालें पाहिजे हाच सामान्यतः कल असतो. शेंकडों वर्षे रानटी व गुलामी अवस्थेच्या गर्तेत पडून राहिलेल्या लोकांचा उद्धार करण्याकरितां

ओटोकाट श्रम करण्यांत येतात व आजच्या संस्कृतींत त्यांनीं भागीदार व्हावें असेंही परिश्रम करण्यांत येतात. आम्हांला शिक्षण देण्याकरितां असंख्य पुस्तकें, पत्रकें व वर्तमानपत्रें दरसाल प्रसिद्ध केलीं जातात. आणि आम्हींही वाचतों. आमच्या मुलां-करितां प्राथमिक शाळा व आमच्यांतील तरुण मंडळींकरितां औद्योगिक शिक्षणसंस्था पुष्कळ ठिकाणीं काढण्यांत आल्या असून त्या अगदीं गच्च भरून गेल्या आहेत. देशांतील अगदीं कोपऱ्यां-तील खेड्यांत सुद्धां व्याख्यानें देण्याची सोय करण्यांत आली असून तेथील लोक कुतूहलानें तीं व्याख्यानें ऐकत असतात. ज्ञानाचा प्रसार झपाट्यानें होत आहे. निरक्षरतेला हद्दपार करण्यांत आलें आहे. व तीही झपाट्यानें दृष्टीआड होत चालली आहे. जुन्या पिढींतील पुष्कळच लोकांना वाचावयास येऊं लागलें असून यांपैकीं कांहीं थोड्या लोकांना वाचावयास व लिहिण्यासही येऊं लागलें आहे. पुरुषाशीं समानतेच्या दर्जानें स्त्रियांना वागविलें जातें. स्त्रियांनाही जी मान्यता मिळाली आहे, त्याचें त्यांनीं चीजही करून दाखविलें आहे. समाजाच्या कारभारांतील प्रत्येक खात्यांत नायकीण, मॅनेजर, सेक्रेटरी व डायरेक्टर यांसारख्या जबाबदारीच्या जागांवर कामें करीत असलेल्या स्त्रिया तुम्हांला आढळल्याशिवाय राहणार नाहींत. अशा प्रकारचीं जबाबदारीचीं कामें अंगांवर घेऊन राजकीय, सामाजिक व आर्थिक कारभारा-लाही किफायतशीर वळण त्यांनीं लावून दिलें आहे. याप्रमाणें सर्व प्रकारच्या सुखसोयी झाल्या असतांना देशांतील कामकऱ्यां-च्या मनांत असंतोषाची भावना कशी उत्पन्न होणार ?

प्रश्नः—वैयक्तिक वैभव वाढविण्याच्या कामीं सोविएट सरकार उत्तेजन देत नाहीं, व सहकार्यानें शेती करण्याबद्दल सक्ती करण्यांत

येते तेव्हां सरकारचें हें कृत्य तुम्हांला संमत आहे असेंच तुमचें म्हणणें कीं नाहीं ? या लोकांच्या कम्यूनिझमनें एवढी मोठी मजल गांठली आहे कां ?

उत्तरः–" बऱ्याच लोकांच्या बाबतींत असें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे. या धोरणामुळें मनुष्याची प्रेरकशक्ति नाहींशी होते, अशी कांहीं खेडुतांची तक्रार आहे तर या धोरणामुळें सर्व समाजचा समाज जागा होतो या समजुतीनें पुष्कळ लोक या धोरणाचा पुरस्कारही करतात. माझी स्वतःचीही अशीच समजूत आहे. व आमचें गांव व त्याच्या आसपासच्या खेड्यांतील मंडळी त्याच विचाराचीं आहेत रशियाच्या लोकसत्ताक राज्यांत कम्यूनिझमची दृढतर पायावर प्रस्थापना करण्याचा व भांडवलदारीच्या वाढीला आळा घालण्याचा सोंविएट सरकारचा विचार आहे. आमच्या खेड्यांतील लोकांनाही ही गोष्ट चांगली पटते. रशियांतील प्रजासत्ताक राज्याची एकजूट करावी व समाजाचे व व्यक्तीचे हितसंबंध एकरूप करावे व खेडेगांवांतील सर्व शेतकरीवर्गाची सांपत्तिक स्थिति सुधारावी याच उद्देशानें हें धोरण स्वीकारण्यांत आलें आहे.

प्रश्नः–एका बाजूनें तुमच्या मालावर जकात लादण्यांत आली आहे. व तुमच्या मालाची किंमत ठरविण्याचाही अधिकार सरकारनें आपल्या हातीं ठेवला आहे. ही गोष्ट तुम्हांला कशी काय पटते ?

उत्तरः–सरकारनें शेतकीच्या जनावरांचें ब्रीड सुधारलें आहे. व शेतीच्या बाबतींतील शास्त्रीय संशोधन व प्रयोग लोकप्रिय करून सोडले आहेत. व तें प्रत्यक्ष अमलांत आणण्याच्या बाबतींत मागेंपुढें न पहातां पैसा खर्च केला आहे. या सर्व गोष्टी शेतकऱ्यांच्या हिताच्या झाल्या आहेत परंतु आमचें धान्य परदेशांत जोंपर्यंत आम्हीं स्वस्त दरानें व फायदेशीर रीतीनें विकूं शकत नाहीं,

तोंपर्यंत आमचें आजपर्यंत झालेलें नुकसान आम्हीं भरून काढूं शकणार नाहीं.

प्रश्नः-तुम्हीं पुष्कळ वाचतां काय ?

उत्तरः-आमच्या हातांत काम नसलें कीं, आम्हीं पुस्तकें वाचावयास घेतों. आम्हांला वाचावेंच लागतें. वाचन व कम्यूनिझम हीं दोन्हीं एकसमयावच्छेदेंकरून चाललीं पाहिजेत. तीं एकरूप आहेत असें लेनिन नेहमीं सांगत असे. वाचीत राहिल्यानें व व्याख्यानें ऐकल्यानें मी नास्तिक व कम्यूनिस्ट बनलों. माझें सर्व कुटुंब मुलेंबाळेंसुद्धां सर्वजण त्याच विचारांचीं झालीं आहेत.

प्रश्नः-काय लहान मुली नास्तिक बनल्या आहेत ?

उत्तरः-खचित बनल्या आहेत. त्या सात वर्षांच्या झाल्या तेव्हांपासून त्या नास्तिक. त्या कां नास्तिक बनल्या हें त्यांना विचारा कीं, त्याबरोबर कारणांची परंपराच परंपरा त्या तुम्हांला सांगतील. त्यांच्या हुषारीबद्दल व त्यांना असलेल्या पुष्कळ सामान्य माहितीबद्दल त्यांच्या शाळेंत त्याची प्रसिद्धी झाली आहे. पायोनियर संस्थेच्या त्या सभासद आहेत व या सभासदत्वाबद्दल त्यांना अभिमानही वाटतो.

प्रश्नः-हे पायोनियर कोण ?

उत्तरः-पायोनियर म्हणजे मुलामुलींचीं मंडळें होत या प्रत्येक मंडळांत ४० ते ५० पर्यंत मुलें असतात, त्यांत जवळजवळ निम्म्या मुलीच असतात. या पायोनियरांची संख्या २० लाखांवर आहे.

प्रश्नः-तुमच्या बापजाद्यांच्या चर्चची ही अवस्था झालेली पाहून त्याबद्दल तुम्हांला कांहींच वाईट वाटत नाहीं ?

उत्तरः-नाहीं. पण कांहीं लोकांना खेद वाटतो. असा एक मनुष्य मला माहीत आहे कीं, तो पाद्र्याला शरण गेला व त्याच्या

मूर्तीला त्यानें लोटांगण घातलें. क्रांतिकारक मंडळांशीं असलेला आपला संबंध त्यानें तोडला पण मला कधींच वाईट वाटलें नाहीं.

प्रश्नः–निरीश्वरवादी नियतकालिक तुम्हीं वाचीत असता काय ?

उत्तरः–पूर्वी मी तें अगदीं नियमानें घेत होतों. परंतु आतां घेत नाहीं. वाचनकुटीरांत तें अद्याप येत असतें. व त्यांतला एकादा चांगला लेख वाचण्याबद्दल मला कोणी सांगितलें तर तो मी वाचतो. पण 'धर्मशत्रू' नांवाच्या मासिकांतील पानन् पान मी लक्षपूर्वक वाचतों. या मासिकांतील विचार माझ्या अंतः-करणाला पटतात. शिवाय निरीश्वर मंडळाचा मी एक कार्यकारी सभासदही आहे.

प्रश्नः–'वाचन-कुटीर' ही कशा प्रकारची संस्था आहे ?

उत्तरः–खेडेगांवांतील मंडळींना एकत्र आणण्याकरितां व त्यांची सभा भरविण्याकरितां बांधलेली ही एक खोली असते. या खोलींत एकत्र आलेल्या खेडुतांना राजकारण व इतर विषय यांच्यासंबंधानें शिक्षण देण्यांत येतें. या खोलींत वर्तमानपत्रें, मासिकें, पुस्तकें, ठेविलेलीं असतात. खोलींतील भिंतीवरून छोटीं छोटीं बातमीपत्रेंही चिकटविलेलीं असतात. प्रत्येक खेड्यांत अशी एक 'वाचन-कुटीर' असते. सोविएट प्रजासत्ताक राज्यांत अशीं २५००० कुटीरें आहेत मोठमोठ्या शहरांतील भव्य वाचनमंदिरांप्रमाणें, क्लबाप्रमाणें, किंवा संशोधन-शालांप्रमाणें हीं कुटीरें नसतात हें उघड आहे, पण आम्हीं शहरांत गेलों तर तेथील वरील प्रकारच्या संस्थांचा आम्हाला मोफत रीतीनें उपयोग करून घेतां येतो. आम्ही शहरांत वेळोवेळीं कांहीं कामाकरितां गेलों किंवा करमणुकीकरतां गेलों तर या संस्थांचा आम्ही उपयोगही करतो. शेतांच्या सीमेसंबंधानें कांहीं तंटा उपस्थित झाला किंवा गांवांत

कांहीं स्थानिक भानगड उपस्थित झाली कीं मास्कोसारख्या शहरांतील किसानगृहांकडे आम्हीं धांव घेतों व त्या ठिकाणीं आपला मोफत कायदेशीर सल्ला मिळतो. या सर्व संस्था शेतकऱ्यांना उपयुक्त अशा आहेत.

वरीलप्रमाणें सोविएट सरकारनें कितीही मतप्रचार केला तरी आपला जमिनीचा तुकडा सामुदायिक शेतींत सामील करण्यास राजी नसलेले शेतकरी अद्याप रशियांत आहेत पण रशियांतील शेतकऱ्यांच्या लोकसंख्येच्या मानानें शें. ४ इतकेंही त्यांचें प्रमाण नाहीं. सोविएट सरकार स्वातंत्र्याचें भोक्तें असल्यामुळें या शेतकऱ्यांच्या व्यवहारांत तें कधींही अडथळे उत्पन्न करीत नाहीं. रशियांतील बहुतेक सर्व शेतकरी आज सामुदायिक शेतीच्या व्यवहारांत सामील झाले आहेत. सोविएट सरकारनें गेल्या आठ-दहा वर्षांत देशाच्या औद्योगिक व कृषिविषयक भरभराटीकरितां दोन पंचवार्षिक योजनांची आंखणी केली व या दोन्ही योजना त्यानें ठरलेल्या मुदतीच्या आंतच यशस्वी केल्या. रशियांतील शेतकऱ्यांची सरकारच्या या योजनेला सहानुभूति व सहाय्य नसतें तर या योजना पार पडणें कधींही शक्य झालें नसतें. रशियाचा शेतकरी जमिनीच्या एकाद्या तुकड्याचा आज प्रत्यक्ष मालक नसला तरी सामुदायिक शेतांवर इतराप्रमाणें त्याचीही सामुदायिक मालकी आहे. या शेतांत उत्पन्न झालेल्या मालावरही त्याची मालकी आहे. या शेतावर केलेल्या मेहनत मशागतीचा पूर्ण मोबदला घेण्याचा त्याला हक्क आहे. सामुदायिक शेतीमुळें रशियाचें शेतीचें उत्पन्न शेंकडों पटीनें आज वाढलें आहे. रशियाचा शेतकरी आज स्वतंत्र आहे, बुद्धिविकासाची व आत्म-

विकासाची सर्व प्रकारची संधी त्याला मिळत आहे, आणि आपलें जीवन सुखमय व आनंदमय करण्याची सर्व साधनें त्याला आज प्राप्त झालीं आहेत.

संदर्भ-ग्रंथ

1. Russia,
by D. Mackemyi wallace M. A.
2. Russia and the strueggle for peace,
by Michel S. Farbma.
3. History of Russia,
by N. M. Pokrtvasky.
4. Building collective farms,
by J. Stalin.
5. History of Russian Revotion,
by Leon Trotsky.
6. Russia today and yesterday,
by E. G. Dilan.
